भगवती शर्मा :-

मा. महापौर मॅडम मैंने बोला है इस गोषवारा के अनुसार गटनेता को नाम देना है। यह क्लियर है उनको स्विकार करके नाम घोषित करना महापौर का अधिकार है। लेकिन इसके अलावा इस विषय पे ठराव हो सकता है उसके वैधता के बारे में मा. आयुक्त, मा. सचिव से प्रश्न पूछता हूँ। अगर उसकी वैधता है अगर वो बोलते है। तो उस हिसाब से हम ठराव करेंगे नही तो नही करेंगे।

मा. महापौर :-

आपने यह कलम पढा है। संख्या का विवाद होता है तब निर्णय.................

भगवती शर्मा :-

नही उसमें ऐसा भी लिखा है की, अगर ऐसा प्रश्न आता है तो मा. महापौर, मा. उपमहापौर, सभागृह नेता, विरोधी पक्षनेता, गटनेता के साथ मिटींग की जाती है। लेकिन वो तो नही है उसमें यह भी लिखा हूआ है।

मा. महापौर :-

ठीक है आपका जवाब मा. आयुक्त देंगे।

मा. आयुक्त :-

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २० स्थायी समितीची रचना त्याच्यामध्ये ५ मध्ये असे स्पष्ट केले आहे की महानगरपालिका पोट कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या निवृत्तीच्या तारखेच्या मागील महिन्यातील आपल्या पहिल्या सभेच्या उक्त तारखेत जे सदस्य निवृत्त होणार असतील त्या सदस्यांच्या पदाच्या जागा भरण्यासाठी स्थायी समितीच्या नविन सदस्यांची नेमणूक केली पाहिजे. हा विषय ज्यावेळी डिस्प्यूट झाला. डिस्प्यूटमध्ये महानगरपालिकेला म्हणजे महासभेला अधिकार आहे म्हणून तो निर्णय महासभेच्या ह्याच्यामध्ये सोडलेला आहे. तो निर्णय ठरावाच्या स्वरुपात होऊ शकतो.

मा. महापौर :-

भगवतीजी निर्णय आप किसको बोलेंगे। निर्णय तो इसी तरह से होता है।

भगवती शर्मा :-

मॅडम इन्होंने पढके सुनाया था।

नरेंद्र मेहता :-

मॅडम सभागृहाचा वेळ जातो. ह्याच्यावर बरीचशी चर्चा झालेली आहे. त्यांना ठराव मांडायचा असेल तर त्यांनी ठराव मांडावा.

भगवती शर्मा :-

लिगलीटी होएगी तो मांडेगे ना।

नरेंद्र मेहता :-

मॅडम आम्ही ठराव मांडला आहे. मा. आयुक्तांना वाटते ते बरोबर नाही तर ते विखंडीतला पाठवतात.

भगवती शर्मा :-

मा. आयुक्त साहेब आप जो कलम ३ का हवाला दे रहे है। लेकिन उसके अंदर कलम २ का भी देखीए। अगर आप २१ पढ रहे हो तो एक भी है, दो भी है, तीन भी है। २ पे लिखा है समितीवर पालिका सदस्याचे नाम निर्देशन करताना महानगरपालिका मान्यता प्राप्त पक्षाचे अथवा नोंदणीकृत पक्षाचे अथवा गटाचे तौलानिक संख्याबळ विचारात घेईन आणि सभागृह नेता, विरोधी पक्षनेता अशा प्रत्येक पक्षाच्या किंवा गटाच्या नेता यांच्याशी विचारविनिमय करुन शक्यतो महानगरपालिका अशा पक्षाच्या किंवा गटाच्या संख्याबळाप्रमाणे सदर नामनिर्देशन तो इसका भी पालन होना चाहिए।

मा. महापौर :-

आपको ठराव करने की इच्छा है।..............

भगवती शर्मा :-

हमारे हिसाबसे इसकी लिगलटी नही है। तो हमारा विरोध है।

मा. महापौर :-

ठिक है।

भगवती शर्मा :-

जो ठराव दिया गया है इसको राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, कॉंग्रेस का पूर्ण रुपसे विरोध है।

मा. महापौर :-

लेकीन में अभी यह ठराव मंजूर करती हूँ। निर्णय के स्वरुप में महासभा में निर्णय इसी तरह से लिया जाता है।

भगवती शर्मा :-

मा. महापौर मॅडम वो आपको अधिकार है। उसमें हमको बोलने का कोई अधिकार नही। लेकिन हम इस ठराव का पूर्ण रुप से विरोध करते है।

मा. महापौर :-

पूढचा विषय घ्या.

प्रकरण क्र. ८७ :-

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण २ कलम २०(३) अन्वये मा. स्थायी समितीच्या रिक्त होणाया आठ (८) सदस्यांच्या जागी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २०(५) अन्वये नविन आठ (८) सदस्यांची नेमणूक करणे. तसेच स्थायी समितीच्या एका सदस्यानी राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या जागी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण २ कलम २३ अन्वये एक (१) सदस्याची नेमणूक करणे.

निवृत्त होणाया सदस्यांची नावे खालीलप्रमाणे :-

१) श्री. प्रशांत केळुसकर -- भारतीय जनता पार्टी
२) श्री. मोहन महादेव जाधव -- भारतीय जनता पार्टी
३) ॲड. रवी व्यास -- भारतीय जनता पार्टी
४) श्री. जयंतीलाल गुरुनाथ पाटील -- शिवसेना
५) श्री. मुन्ना सिंह -- राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी
६) श्री. स्टिवन जॉन मेंन्डोंसा -- राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी
७) श्री. नरेश तुकाराम पाटील -- राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी
८) ॲड. सुहास माधवराव रकवी -- भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पार्टी

राजीनामा दिलेल्या सदस्याचे नावे खालीलप्रमाणे :-

१) श्री. दिनेश जैन -- भारतीय जनता पार्टी

ठराव क्र. ८७ :-

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण २ कलम २०(३) अन्वये मा. स्थायी समितीच्या रिक्त होणाया आठ (८) सदस्यांच्या जागी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २०(५) अन्वये नविन आठ (८) सदस्यांची नेमणूक करणे. तसेच स्थायी समितीच्या एका सदस्यानी राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या जागी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण २ कलम २३ अन्वये एक (१) सदस्याची नेमणूक करणे.

निवृत्त होणाया सदस्यांची नावे खालीलप्रमाणे :-

१) श्री. प्रशांत केळुसकर -- भारतीय जनता पार्टी
२) श्री. मोहन महादेव जाधव -- भारतीय जनता पार्टी
३) ॲड. रवी व्यास -- भारतीय जनता पार्टी
४) श्री. जयंतीलाल गुरुनाथ पाटील -- शिवसेना
५) श्री. मुन्ना सिंह -- राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी
६) श्री. स्टिवन जॉन मेंन्डोंसा -- राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी
७) श्री. नरेश तुकाराम पाटील -- राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी
८) ॲड. सुहास माधवराव रकवी -- भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पार्टी

राजीनामा दिलेल्या सदस्याचे नाव खालीलप्रमाणे :-

१) श्री. दिनेश जैन -- भारतीय जनता पार्टी

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण २ कलम २० (३) अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्थायी समितीवरील सदस्यांपैकी निम्मे आठ सदस्य माहे नोव्हेंबर २०१५ च्या पहिल्या तारखेस निवृत्त होत आहेत.

उर्वरीत आठ सदस्यांपैकी १) श्री. दिनेश जैन (भारतीय जनता पार्टी) यांनी देखील आपल्या स्थायी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिलेला आहे. करिता त्यांचे रिक्त जागी उर्वरीत कालावधीसाठी भारतीय जनता पक्षाच्या एका सदस्याची नेमणूक करणे आवश्यक आहे.

निम्मे आठ सदस्य निवृत्त करताना भारतीय जनता पार्टी ३, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ३, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस १ व शिवसेना १ असे एकुण आठ सदस्य निवृत्त होणार आहेत. मा. उपसचिव, नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. संकीर्ण २००८/४३४/प्र.क्र.१५१/२००८/नवी-२५, दि. २० ऑक्टोबर २००८ अन्वये निवृत्त होणाऱ्या आठ व राजीनामा दिलेल्या एक सदस्याच्या जागी त्याच मान्यताप्राप्त पक्षाचे, नोंदणीकृत पक्षाचे, गटाचे, आघाडीचे किंवा फ्रंटचे नवीन सदस्य स्थायी समितीवर नेमणे अध्यारुत आहे. मात्र अशा वेळेस पुर्वीच्या तुलनेने पक्षांच्या / गटांच्या तौलानिक संख्येत बदल झालेला नसावा.

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक २०१२ पार पडल्यानंतर सर्व पक्षांनी विभागीय आयुक्त यांचेकडे पक्षांची पाठींब्यासह संख्या नोंदणी केलेली आहे. तसेच त्यांनतर ही पाठींब्यामध्ये झालेल्या बदलाची नोंद घेतली असुन विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी महानगरपालिकेस वेळोवेळी कळविले आहे.

त्यानुसार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे अपक्ष नगरसेवक श्री. मुन्ना सिंह ह्यांनी पाठींबा दिलेला होता. त्यानुसार विभागीय आयुक्त यांनी कळविले होते. परंतु अपक्ष नगरसेवक श्री. मुन्ना सिंह ह्यांनी दि. १७/०१/२०१५ रोजी विभागीय आयुक्त, कोकण विभाग ह्यांना पत्र देऊन भारतीय जनता पार्टीस पाठींबा देत असुन त्यांच्या नावाचा समावेश भारतीय जनता पार्टीच्या गटात करावा अशी विनंती केली होती.

त्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, कोकण विभाग ह्यांनी पत्र क्र. साशा/कार्या-३/नपा-२/मिरा भाईंदर/कावि ८०/२०१६, दि. २०/०५/२०१६ रोजीच्या पत्रान्वये अपक्ष नगरसेवक श्री. मुन्ना सिंह ह्यांच्या पत्रान्वये केलेल्या विनंतीनुसार दिलेल्या पाठींब्याची नोंद घेतली असल्याचे कळविले आहे. त्यामुळे तौलानिक संख्याबळात बदल झालेला आहे.

सबब तौलानिक संख्याबळात बदल झाल्याने १६ सदस्यांची नव्याने तौलानिक संख्या काढुन पक्षाच्या बलाबल नुसार १६ सदस्य निश्चीत केले जातील ते खालीलप्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | भारतीय जनता पार्टी | ३२ ÷ ९३ X १६ = ५.५० | ५ |
| २ | शिवसेना | १५ ÷ ९३ X १६ = २.५८ | ३ |
| ३ | राष्ट्रवादी काँग्रेस | २६ ÷ ९३ X १६ = ४.४७ | ४ |
| ४ | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | १७ ÷ ९३ X १६ = २.९२ | ३ |
| ५ | बहुजन विकास आघाडी | ०३ ÷ ९३ X १६ = ०.५१ | १ |
| | | एकुण | १६ |

निवृत्त होणारे आठ सदस्य वगळता भारतीय जनता पार्टी २, शिवसेना २, राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टी २ व भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस पक्ष २ असे एकुण आठ सदस्य आठ (८) सदस्य शिल्लक आहेत.

वरील तक्यामध्ये दर्शविलेल्या पक्षीय बलाबळाच्या तौलानिक संख्याबळामधुन सद्या शिल्लक असलेले सदस्य संख्या वजा जाता सद्यस्थितीत असलेल्या पक्षीय तौलानिक संख्येच्या बलाबळानुसार पुढीलप्रमाणे सदस्य नेमणुक होणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | पक्षाचे नांव | तौलानिका संख्याबळानुसार एकुण सदस्य संख्या | निवृत्त होणारे सदस्य संख्या | शिल्लक सदस्य संख्या | प्रस्तावित सदस्य संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | भारतीय जनता पार्टी | ५ | ३ | २ | ३ |
| २ | शिवसेना | ३ | १ | २ | १ |
| ३ | राष्ट्रवादी काँग्रेस | ४ | ३ | २ | २ |
| ४ | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ३ | १ | २ | १ |
| ५ | बहुजन विकास आघाडी | १ | ० | ० | १ |
| | एकुण | १६ | ८ | ८ | ८ |

निवृत्त होणाऱ्या आठ सदस्यांच्या जागी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण २ कलम २० (५) अन्वये नविन आठ सदस्यांची उर्वरीत कालावधीसाठी नेमणूक होणेस व महाराष्ट्र

महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण २ कलम २३ अन्वये राजीनामा दिलेल्या एका सदस्याच्या जागी उर्वरीत कालावधीसाठी नेमणूक होणेस प्रस्तावित आहे.

परंतु ८ अधिक १ जागा एकूण ९ जागेऐवजी १० नावे प्रस्तावित झाली आहेत.

१) भारतीय जनता पार्टी - श्री. राकेश शाह
२) भारतीय जनता पार्टी - श्री. यशवंत कांगणे
३) भारतीय जनता पार्टी - श्रीम. वर्षा भानुशाली
४) भारतीय जनता पार्टी - श्री. प्रेमनाथ पाटील
५) शिवसेना - श्रीम. तारा घरत
६) बहुजन विकास आघाडी - श्री. राजु भोईर
७) भारतीय राष्ट्रीय काँग्रेस - श्रीम. झिनत कुरेशी
८) राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी - श्रीम. असेन्ला मेंन्डोंसा-परेरा
९) राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी - श्रीम. दक्षता ठाकुर
१०) राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी - श्रीम. बाबरा रॉड्रीक्स

एकूण ९ ऐवजी १० नावे प्रस्तावित झाली आहेत. नियमाप्रमाणे भारतीय जनता पार्टी ३ + १ एकूण ४, शिवसेना १, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस १, बहुजन विकास आघाडी १ व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी २ नावे द्यायची होती. परंतु राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ह्यांनी १ नाव जास्त दिलेले आहे.

कलम ३१(अ)३ नुसार पालिका सदस्य संख्या संदर्भात काही वाद उत्पन्न झाल्यास मा. महासभेचा निर्णय अंतिम राहील. कलम ३१(अ)३ नुसार मा. महासभा खालील नावांची शिफारस करीत आहे.

१) भारतीय जनता पार्टी - श्री. राकेश शाह २) भारतीय जनता पार्टी - श्री. यशवंत कांगणे
३) भारतीय जनता पार्टी - श्रीम. वर्षा भानुशाली ४) भारतीय जनता पार्टी - श्री. प्रेमनाथ पाटील
५) शिवसेना - श्रीम. तारा घरत ६) बहुजन विकास आघाडी - श्री. राजु भोईर
७) भारतीय राष्ट्रीय काँग्रेस - श्रीम. झिनत कुरेशी, ८) राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी- श्रीम. असेन्ला मेंन्डोंसा-परेरा
९) राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी - श्रीम. दक्षता ठाकुर यांची नेमणूक करण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. नरेंद्र मेहता अनुमोदक :- श्रीम. वर्षा भानुशाली

ठराव बहुमताने मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ८८, महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे आरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम १९७५ अन्वये वृक्ष प्राधिकरण समितीच्या सदस्य पदासाठी नियुक्ती करणे.

मा. महापौर :-

वृक्ष प्राधिकरण समितीवर सदस्य नेमण्याकरिता भारतीय जनता पार्टीचे श्रीम. भगवती रावल, श्रीम. सिमा शहा, श्रीम. प्रतिभा पाटील, श्रीम. दिप्ती भट, श्रीम. सुमन कोठारी. शिवसेनाकडून श्रीम. अनिता परमार, श्रीम. प्रणाली पाटील. बहुजन विकास आघाडीकडून श्री. मोहन जाधव. राष्ट्रवादी पक्षाकडून श्रीम. वंदना चक्रे, श्रीम. अनिता जयवंत पाटील, श्रीम. भावसार शिल्पा कमलेश, श्रीम. पाटील वंदना विकास. काँग्रेस पक्षाकडून श्रीम. पाटील सुनिता कैलास, श्रीम. पूजारी कांचना शेखर, श्री. शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम सभी सदस्य का अभिनंदन वृक्ष प्राधिकरण समिती के लिए घोषित करती हूँ।

प्रकरण क्र. ८८ :-

झाडाचे आरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम १९७५ अन्वये वृक्ष प्राधिकरण समितीच्या सदस्य पदासाठी नियुक्ती करणे.

ठराव क्र. ८८ :-

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे आरक्षण जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण २ नियम ३(१) अन्वये संबंधित नागरी स्थानिक प्राधिकरणाने त्या प्राधिकरणास ठरवता येईल असे रितीने आणि मुदतीसाठी नेमण्यात आलेल्या अध्यक्ष व इतर यासह कमीत कमी ५ आणि जास्तीत जास्त १५ व्यक्तींचे मिळून बनलेल्या एका वृक्ष प्राधिकरणाची रचना करता येईल अशी तरतुद आहे.

उक्त तरतुदीनुसार १५ सदस्यांची वृक्ष प्राधिकरण समिती गठित करण्यात येत असून तौलानिक संख्या बलाबलानुसार व सर्वपक्षीय गटनेत्यांनी त्या त्या पक्षाच्या सदस्यांचे नामनिर्देशन केलेनुसार खालील सदस्यांचीनावे वृक्ष प्राधिकरण समितीसाठी घोषीत करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | सदस्याचे नाव | फ्रंट/आघाडी |
|---|---|---|
| १ | श्रीम. भगवती रावल | भारतीय जनता पार्टी |
| २ | श्रीम. सिमा शाह | भारतीय जनता पार्टी |

| | | |
|---|---|---|
| ३ | श्रीम. प्रतिभा तांगडे-पाटील | भारतीय जनता पार्टी |
| ४ | श्रीम. दिप्ती भट्ट | भारतीय जनता पार्टी |
| ५ | श्रीम. सुमन कोठारी | भारतीय जनता पार्टी |
| ६ | श्रीम. अनिता परमार | शिवसेना |
| ७ | श्रीम. प्रणाली संदिप पाटील | शिवसेना |
| ८ | श्री. मोहन जाधव | बहुजन विकास आघाडी |
| ९ | श्रीम. वंदना रामदास चक्रे | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| १० | श्रीम. अनिता जयवंत पाटील | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| ११ | श्रीम. भावसार शिल्पा कमलेश | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| १२ | श्रीम. वंदना विकास पाटील | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| १३ | श्रीम. पाटील सुनिता कैलास | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष |
| १४ | श्रीम. पुजारी कांचना शेखर | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष |
| १५ | श्री. शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष |

सही /-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ८९, महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी सणानिमित्त सानुग्रह अनुदान देणेबाबत.

निलम ढवण :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील आस्थापनेवरील स्थायी व अस्थायी अधिकारी/कर्मचारी यांना दरवर्षी दिवाळी सण कालावधीत सानुग्रह अनुदान देण्यात येते यावर्षी ही रयतराज कामगार संघटना, श्रमिक जनरल कामगार संघटना व महाराष्ट्र नवनिर्माण महापालिका कामगार कर्मचारी सेना यांसकडुन सानुग्रह अनुदानाची मागणी करण्यात आलेली आहे.

दि.३१/१०/२००२ रोजी मा. मुख्यमंत्री यांचेकडे महानगरपालिका कामगार संघटना व सर्व महानगरपालिका आयुक्त यांचे समवेत झालेल्या बैठकीमध्ये, महानगरपालिकेने आर्थिक परिस्थितीचा विचार करुन, सानुग्रह अनुदान किती द्यावे या बाबतचा निर्णय महानगरपालिका स्तरावर घेण्यात यावा. अशा प्रकारचा निर्णय झाला होता. त्यानुसार नगरविकास विभागाचे पत्र क्र. . जीईएन-१०९७/प्र.क्र.-२६७/ नवि-२४, दि.२७/११/२००२ रोजीच्या पत्रान्वये सर्व महानगरपालिकांना कळविण्यात आलेले आहे. आणि त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देणे बाबत मा. महासभेमार्फत योग्य निर्णय घेतला जातो.

सन-२०१५ मध्ये महानगरपालिका मा. महासभा ठराव क्र.६५, दि.१५/१०/२०१५ अन्वये मंजूर करुन अदा करण्यात आलेल्या सानुग्रह अनुदान तपशील खालील प्रमाणे आहे :-

<u>महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी/कर्मचारी करीता</u>

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचा तपशिल | कार्यरत अधिकारी/कर्मचारी | सन २०१५-१६ या वर्षाकरीता मंजुर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम रुपये | सानुग्रह अनुदानापोटी एकुण खर्चास मंजुरी दिलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | महापालिका आस्थापनेवरील वर्ग-०२ ते वर्ग-०४ संवर्गातील कर्मचारी वर्ग | १४९५ | १४,०००/- | २,०९,३०,०००/- |
| २. | संगणक चालक/लघुलेखक | ६९ | ११,०००/- | ७,५९,०००/- |
| ३. | बालवाडी शिक्षिका (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ०५ | ७,०००/- | ३५,०००/- |
| ४. | क्षयरोग नियंत्रक व आय.सी.टी.सी. कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ३४ | ६,५००/- | २,२१,०००/- |
| ५. | लिंक वर्कर (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ११२ | ७,०००/- | ७,८४,०००/- |
| ६. | सुवर्ण जयंती योजना विभागातील कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ०२ | ४,०००/- | ८,०००/- |
| ७. | स्व.इंदिरा गांधी रुग्णालयामधील कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | १४ | १०,५००/- | १,४७,०००/- |
| ८. | स्थानिक संस्था कर विभागातील ठोक | ०५ | ६,०००/- | ३०,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | मानधनावरील कार्यरत असलेले ऑडीट लिपीक | | | |
| ९. | बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ३२ | ६,५००/- | २,०८,०००/- |
| १०. | कनिष्ठ अभियंता (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ०७ | ११,०००/- | ७७,०००/- |
| | एकुण | १७७५ | | २,३१,९९,०००/- |

*शिक्षण विभागातील कार्यरत शिक्षक वर्गाकरीता*

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचा तपशिल | शिक्षक वर्गाची संख्या | सन २०१५-१६ या वर्षाकरीता मंजुर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम रुपये | सानुग्रह अनुदानापोटी एकुण खर्चास मंजुरी दिलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | मिरा भाईंदर प्राथमिक शाळा शिक्षक वर्ग व सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी | २०६ | १२,५००/- | २५,७५,०००/- |

वरीलप्रमाणे महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी यांना मागील वर्षी सानुग्रह अनुदान वाटपासाठी एकूण रु. २,३१,९९,०००/-तसेच शिक्षण विभागातील कार्यरत शिक्षक वर्गाकरीता मागील वर्षी सानुग्रह अनुदान वाटपासाठी एकूण रु. २५,७५,०००/-इतका खर्च मंजुर असुन त्याप्रमाणे सानुग्रह अनुदानाचे वाटप करण्यात आलेले आहे.

चालु वर्षासाठी कर्मचारी वर्ग व कामगार संघटनानी सानुग्रह अनुदानाची मागणी केलेली आहे.

महानगरपालिका आस्थापनेवरील दि. ३१/०३/२०१६ पर्यंत कार्यरत असलेले स्थायी व अस्थायी अधिकारी/कर्मचारी यांना मागील वर्षी मंजूर रक्कमेप्रमाणे सानुग्रह अनुदान द्यावयाचे झाल्यास, त्याचा अपेक्षित खर्च पुढील प्रमाणे आहे.

*महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी /कर्मचारी करीता:-*

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचा तपशिल | कार्यरत अधिकारी/कर्मचारी | सन २०१५-१६ या वर्षाकरीता मंजुर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम रुपये | सानुग्रह अनुदानापोटी एकुण खर्चास मंजुरी दिलेली रक्कम (प्रत्यक्ष वाटप केलेली) |
|---|---|---|---|---|
| १. | महापालिका आस्थापनेवरील वर्ग-०२ ते वर्ग ०४ संवर्गातील कर्मचारी वर्ग | १५३१ | १६,०००/- | २,४४,९६,०००/- |
| २. | संगणक चालक/लघुलेखक (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ७१ | १४,०००/- | ९,९४,०००/- |
| ३. | बालवाडी शिक्षिका (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ०५ | ८,०००/- | ४०,०००/- |
| ४. | कुष्ठरोग तंत्रज्ञ, आय.सी.टी.सी. कर्मचारी व आर.एन.टी.सी.पी. कर्मचारी, मलेरिया पर्यवेक्षक, आर.बी.एस.के. पथक, राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ३५ | ७,५००/- | २,६२,५००/- |
| ५. | लिंक वर्कर (ठोक मानधनावरील कर्मचारी) | १२७ | ८,०००/- | १,०१,६००/- |
| ६. | सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी | ०६ | ५,०००/- | ३०,०००/- |
| ७. | स्व.इंदिरा गांधी रुग्णालयामधील कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | १३ | ११,५००/- | १,४९,५००/- |
| ८. | स्थानिक संस्था कर विभागातील ठोक | ०५ | ७,०००/- | ३५,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | मानधनावरील कार्यरत असलेले ऑडीट लिपीक | | | |
| ९. | बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ३० | ७,५००/- | २,२५,०००/- |
| १०. | कनिष्ठ अभियंता (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ०७ | १२,०००/- | ८४,०००/- |
| ११. | राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान | ०३ | ८,०००/- | २४,०००/- |
| | एकुण | १८७४ | | २,६४,४१,६००/- |

*<u>शिक्षण विभागातील कार्यरत शिक्षक वर्गाकरीता</u>*

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचा तपशिल | शिक्षक वर्गाची संख्या | सन २०१५-१६ या वर्षाकरीता मंजुर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम रुपये | सानुग्रह अनुदानापोटी एकुण खर्चास मंजुरी दिलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | मिरा भाईंदर प्राथमिक शाळा शिक्षक वर्ग | १९० | १६,०००/- | ३०,४०,०००/- |
| २. | सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी | १६ | १४,०००/- | २,२४,०००/- |
| | एकुण | २०६ | | ३२,६४,०००/- |

वरील प्रमाणे महानगरपालिकेतील आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांना गतवर्षीच्या मंजूर रक्कमानुसार सानुग्रह अनुदान देणेसाठी रुपये २,६४,४१,६००/- (अक्षरी रुपये- दोन कोटी, चौसष्ट लाख एकेचाळीस हजार सहाशे मात्र) खर्च अपेक्षित आहे आणि या वर्षीच्या मंजुर वार्षिक अंदाज पत्रकात रक्कम रु.३.०० कोटी तरतुद आहे.

तसेच शिक्षण मंडळाकडील कर्मचाऱ्यांसाठी रक्कम रु. ३२,६४,०००/- (अक्षरी रुपये- बत्तीस लाख चौसष्ट हजार मात्र) खर्च अपेक्षित आहे आणि या वर्षीच्या मंजुर अंदाजपत्रकात रक्कम रु. ३५/- लाख इतकी तरतुद आहे.

सबब मा. महासभेने मंजूर केलेल्या दराने सानुग्रह अनुदान यावर्षी सुध्दा देणेबाबत ही सभा मंजूरी देत आहे.

नरेंद्र मेहता :-

माझे अनुमोदन आहे.

शुभांगी कोटियन :-

ह्याच्यात एक सुचना आहे. ठरावानुसार मिरा भाईंदर पालिकेतील कर्मचाऱ्यांना दरवर्षीप्रमाणे सर्वांना सानुग्रह उर्वरित अनुदान वाढवून दिलेले आहे. त्याचप्रमाणे जे संगणकचालक ठेकेदारामार्फत सेवेमध्ये आहेत त्यांच्यावर दरवेळी अन्याय होऊ नये हे कर्मचारी देखील महानगरपालिकेसाठी काम करतात त्यांचे योगदान आहे. तरी संबंधित कर्मचाऱ्यांना ठेकेदारांना किमान ५००० प्रत्येकी देण्याची सूचना आपण द्यावी व कार्यवाही करावी अशी सूचना मांडत आहे.

नरेंद्र मेहता :-

मा. आयुक्त साहेब आपल्याकडे आपण बऱ्याच मोठ्या प्रमाणात कर्मचारी अपॉइन्ट केले आहेत. परिवहन संदर्भात आपण बघितले तर त्यांना आपण नियमाप्रमाणे वेतन देतो शासनाचा जो काही नियम आहे मिनिमम वेजेसप्रमाणे अजूनपर्यंत ठेकेदार आहेत त्यांना मिनिमम वेजेस दिले नाहीत. फरकाची रक्कम दिलेली नाही. त्यांचा प्रोव्हिडंट फंड आपल्याकडून घेतला पण त्यांनी प्रॉव्हिडंट फंड भरला नाही. त्यांचा पगार देखील वेळेवर जात नाही. पगार तिसऱ्याच्या नावाने देतो आणि पैसे स्वतः घेतो म्हणजे आपण एक्स.वाय.झेड कंपनीला पेमेन्ट करतो आणि ठेकेदार तिसरा तो देतो ह्याच्यात ठिक आहे कोण देतो पण ज्या काही गोष्टी आहेत त्याची पूर्तता झाली पाहिजे. परिवहन सेवेत जे कर्मचारी ठेक्यावर आहेत त्यांना मिनिमम वेजेस पण नाही, फरकाची रक्कम पण नाही. बोनसचे मी आता बोलतच नाही. बोनस त्यांनी किती द्यावा तो त्यांचा विषय आहे. परंतु इतर गोष्टी ज्या आपल्याकडून घेतल्या आहेत पण त्यांना दिलेल्या नाहीत.

भगवती शर्मा :-

मा. महापौर मॅडम, प्रशासनाने जो गोषवारा दिया है उसमें महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी कर्मचारी नं. १२ राष्ट्रीय नागरिक उपविधी अभियान इसमें ३ आदमी का दिया गया है। लेकिन इसके पहले के अंदर में बोनस का कुछ भी लिखा नही है। इसके पहले दिए नही थे क्या?

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो ३ कर्मचारी जे.एन.एन.यु.आर.एम. खाली त्यांना आपण ह्यावर्षी देणार आहोत. ते फस्ट टाईम आपल्याकडे जॉइन्ट झाले आहेत.

लियाकत शेख :-

मा. महापौर मॅडम, माझी एक सूचना आहे. आपल्याकडे साधारण ३ कोटी ३५ लाखाची तरतूद आहे. तरी काही शिल्लक रकमा आहेत. २ कोटी ६४ लाख रु. त्याच्यात जातात साधारण ४४ ते ४५ लाख शिल्लक राहतात. त्याच्यातील कर्मचाऱ्यांनी प्रत्येकी २-२ हजार वाढवून दिले तर ती रक्कम ॲडजस्ट होईल आणि समजा २ ते ५ लाख रु. कमी जास्त झाले तर त्याचे पुर्नःविनियोजन करण्यात यावे अशी मी सुचना मांडत आहे.

जुबेर इनामदार :-

माझे अनुमोदन आहे. मुळ ठरावात समावेश करण्यात यावा.

मा. महापौर :-

ज्यांनी ठराव मांडला आहे त्यांना मंजूर आहे का?

जुबेर इनामदार :-

नसेल तर आम्ही ठराव मांडू.

मा. महापौर :-

मी आता ठराव मंजूर करते.

जुबेर इनामदार :-

सुचनेसह करता का?

मा. महापौर :-

मी सुचनेसह सांगितले नाही ना.

भगवती शर्मा :-

सांगा ना फेटाळली.

मा. महापौर :-

ठीक आहे सूचना फेटाळली आणि ठराव मंजूर.

निलम ढवण :-

आपण ह्या ठरावावर एक सूचना मांडली आहे.

मा. महापौर :-

तुमची सूचना मी घेते.

प्रकरण क्र. ८९ :-

महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी सणानिमित्त सानुग्रह अनुदान देणेबाबत.

ठराव क्र. ८९ :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील आस्थापनेवरील स्थायी व अस्थायी अधिकारी/कर्मचारी यांना दरवर्षी दिवाळी सण कालावधीत सानुग्रह अनुदान देण्यात येते यावर्षी ही रयतराज कामगार संघटना, श्रमिक जनरल कामगार संघटना व महाराष्ट्र नवनिर्माण महापालिका कामगार कर्मचारी सेना यांसकडुन सानुग्रह अनुदानाची मागणी करण्यात आलेली आहे.

दि.३१/१०/२००२ रोजी मा. मुख्यमंत्री यांचेकडे महानगरपालिका कामगार संघटना व सर्व महानगरपालिका आयुक्त यांचे समवेत झालेल्या बैठकीमध्ये, महानगरपालिकेने आर्थिक परिस्थितीचा विचार करुन, सानुग्रह अनुदान किती द्यावे या बाबतचा निर्णय महानगरपालिका स्तरावर घेण्यात यावा. अशा प्रकारचा निर्णय झाला होता. त्यानुसार नगरविकास विभागाचे पत्र क्र. . जीईएन-१०९७/प्र.क्र.-२६७/ नवि-२४, दि.२७/११/२००२ रोजीच्या पत्रान्वये सर्व महानगरपालिकांना कळविण्यात आलेले आहे. आणि त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देणे बाबत मा. महासभेमार्फत योग्य निर्णय घेतला जातो.

सन-२०१५ मध्ये महानगरपालिका मा. महासभा ठराव क्र.६५, दि.१५/१०/२०१५ अन्वये मंजूर करुन अदा करण्यात आलेल्या सानुग्रह अनुदान तपशील खालील प्रमाणे आहे :-

<u>महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी/कर्मचारी करीता</u>

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचा तपशिल | कार्यरत अधिकारी/कर्मचारी | सन २०१५-१६ या वर्षाकरीता मंजुर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम रुपये | सानुग्रह अनुदानापोटी एकुण खर्चास मंजुरी दिलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| १०. | महापालिका आस्थापनेवरील वर्ग-०२ ते वर्ग-०४ संवर्गातील कर्मचारी वर्ग | १४९५ | १४,०००/- | २,०९,३०,०००/- |
| ११. | संगणक चालक/लघुलेखक | ६९ | ११,०००/- | ७,५९,०००/- |
| १२. | बालवाडी शिक्षिका (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ०५ | ७,०००/- | ३५,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३. | क्षयरोग नियंत्रक व आय.सी.टी.सी. कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ३४ | ६,५००/- | २,२१,०००/- |
| १४. | लिंक वर्कर (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ११२ | ७,०००/- | ७,८४,०००/- |
| १५. | सुवर्ण जयंती योजना विभागातील कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ०२ | ४,०००/- | ८,०००/- |
| १६. | स्व.इंदिरा गांधी रुग्णालयामधील कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | १४ | १०,५००/- | १,४७,०००/- |
| १७. | स्थानिक संस्था कर विभागातील ठोक मानधनावरील कार्यरत असलेले ऑडीट लिपीक | ०५ | ६,०००/- | ३०,०००/- |
| १८. | बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ३२ | ६,५००/- | २,०८,०००/- |
| १०. | कनिष्ठ अभियंता (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ०७ | ११,०००/- | ७७,०००/- |
| एकुण | | १७७५ | | २,३१,९९,०००/- |

*<u>शिक्षण विभागातील कार्यरत शिक्षक वर्गाकरीता</u>*

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचा तपशिल | शिक्षक वर्गाची संख्या | सन २०१५-१६ या वर्षाकरीता मंजुर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम रुपये | सानुग्रह अनुदानापोटी एकुण खर्चास मंजुरी दिलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | मिरा भाईंदर प्राथमिक शाळा शिक्षक वर्ग व सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी | २०६ | १२,५००/- | २५,७५,०००/- |

वरीलप्रमाणे महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी यांना मागील वर्षी सानुग्रह अनुदान वाटपासाठी एकूण रु. २,३१,९९,०००/-तसेच शिक्षण विभागातील कार्यरत शिक्षक वर्गाकरीता मागील वर्षी सानुग्रह अनुदान वाटपासाठी एकूण रु. २५,७५,०००/-इतका खर्च मंजुर असुन त्याप्रमाणे सानुग्रह अनुदानाचे वाटप करण्यात आलेले आहे.

चालु वर्षासाठी कर्मचारी वर्ग व कामगार संघटनानी सानुग्रह अनुदानाची मागणी केलेली आहे.

महानगरपालिका आस्थापनेवरील दि. ३१/०३/२०१६ पर्यंत कार्यरत असलेले स्थायी व अस्थायी अधिकारी/कर्मचारी यांना मागील वर्षी मंजूर रक्कमेप्रमाणे सानुग्रह अनुदान द्यावयाचे झाल्यास, त्याचा अपेक्षित खर्च पुढील प्रमाणे आहे.

*<u>महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी /कर्मचारी करीता:-</u>*

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचा तपशिल | कार्यरत अधिकारी/कर्मचारी | सन २०१५-१६ या वर्षाकरीता मंजुर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम रुपये | सानुग्रह अनुदानापोटी एकुण खर्चास मंजुरी दिलेली रक्कम (प्रत्यक्ष वाटप केलेली) |
|---|---|---|---|---|
| १२. | महापालिका आस्थापनेवरील वर्ग-०२ ते वर्ग ०४ संवर्गातील कर्मचारी वर्ग | १५३१ | १६,०००/- | २,४४,९६,०००/- |
| १३. | संगणक चालक/लघुलेखक (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ७१ | १४,०००/- | ९,९४,०००/- |
| १४. | बालवाडी शिक्षिका (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ०५ | ८,०००/- | ४०,०००/- |
| १५. | कुष्ठरोग तंत्रज्ञ, आय.सी.टी.सी. कर्मचारी व आर.एन.टी.सी.पी. कर्मचारी, मलेरिया पर्यवेक्षक, आर.बी.एस.के. पथक, राष्ट्रीय शहरी | ३५ | ७,५००/- | २,६२,५००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | आरोग्य अभियान (ठोक मानधनावरील कर्मचारी) | | | |
| १६. | लिंक वर्कर (ठोक मानधनावरील कर्मचारी) | १२७ | ८,०००/- | १,०१,६००/- |
| १७. | सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी | ०६ | ५,०००/- | ३०,०००/- |
| १८. | स्व.इंदिरा गांधी रुग्णालयामधील कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | १३ | ११,५००/- | १,४९,५००/- |
| १९. | स्थानिक संस्था कर विभागातील ठोक मानधनावरील कार्यरत असलेले ऑडीट लिपीक | ०५ | ७,०००/- | ३५,०००/- |
| २०. | बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ३० | ७,५००/- | २,२५,०००/- |
| २१. | कनिष्ठ अभियंता (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ०७ | १२,०००/- | ८४,०००/- |
| २२. | राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान | ०३ | ८,०००/- | २४,०००/- |
| एकुण | | १८७४ | | २,६४,४१,६००/- |

*<u>शिक्षण विभागातील कार्यरत शिक्षक वर्गाकरीता</u>*

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचा तपशिल | शिक्षक वर्गाची संख्या | सन २०१५-१६ या वर्षाकरीता मंजुर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम रुपये | सानुग्रह अनुदानापोटी एकुण खर्चास मंजुरी दिलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | मिरा भाईंदर प्राथमिक शाळा शिक्षक वर्ग | १९० | १६,०००/- | ३०,४०,०००/- |
| २. | सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी | १६ | १४,०००/- | २,२४,०००/- |
| एकुण | | २०६ | | ३२,६४,०००/- |

वरील प्रमाणे महानगरपालिकेतील आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांना गतवर्षीच्या मंजूर रक्कमानुसार सानुग्रह अनुदान देणेसाठी रुपये २,६४,४१,६००/- (अक्षरी रुपये- दोन कोटी, चौसष्ट लाख एकेचाळीस हजार सहाशे मात्र) खर्च अपेक्षित आहे आणि या वर्षीच्या मंजुर वार्षिक अंदाज पत्रकात रक्कम रु.३.०० कोटी तरतुद आहे.

तसेच शिक्षण मंडळाकडील कर्मचाऱ्यांसाठी रक्कम रु. ३२,६४,०००/- (अक्षरी रुपये- बत्तीस लाख चौसष्ट हजार मात्र) खर्च अपेक्षित आहे आणि या वर्षीच्या मंजुर अंदाजपत्रकात रक्कम रु. ३५/- लाख इतकी तरतुद आहे.

सबब मा. महासभेने मंजूर केलेल्या दराने सानुग्रह अनुदान यावर्षी सुध्दा देणेबाबत ही सभा मंजूरी देत आहे.

सुचक :- श्रीम. निलम ढवण अनुमोदन :- श्री. नरेंद्र मेहता

सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्या श्रीम. शुभांगी कोटीयन यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.

ठरावानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांना दरवर्षी प्रमाणे सर्वांना सानुग्रह अनुदान वाढवून दिलेले आहे. त्याचप्रमाणे उर्वरीत संगणक चालक ठेकेदारांमार्फत सेवेमध्ये आहेत, त्यांच्यावर देखील अन्याय होवू नये. हे कर्मचारी देखील महानगरपालिकेसाठी काम करतात. त्यांचे योगदान आहे. तरी संबंधित ठेकेदारांना किमान ५०००/- रु. प्रत्येकी कर्मचाऱ्यांना देण्याची सुचना आपण द्यावी व कार्यवाही करावी अशी मी सुचना मांडत आहे.

ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर

सही /-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ९०, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर वैद्यकिय संवर्गातील निवड यादीतील वैद्यकिय अधिकारी (वर्ग-०१) या पदाकरीता उमेदवारांना नियुक्ती आदेश देणेबाबत.

नरेंद्र मेहता :-

मा. आयुक्त साहेब मिरा भाईंदर महानगरपालिकेचा सन्मा. पंडीत भिमसेन जोशी रुग्णालय हे महानगरपालिकेचे सरकारने हस्तांतरण करुन घ्यायचे ह्यासाठी निवेदन केले होते आणि त्या निवेदनाच्या अनुषंगाने कॅबीनेटमध्ये मान्यता सुध्दा झालेली आहे. इथपर्यंत ते बरोबर आहे. ह्याच्यापुढे ते कोणत्या अटीशर्तीने घेणार आहेत पुढची नेमणूक ते करणार आहेत. नाही करणार आहे. आता जे सध्या जे आस्थापनेवर जो स्टाफ आहे त्याला पगार आपण देणार किंवा सरकार आपल्याला अनुदान देतील चालवायला ह्याबद्दल आपल्याला कुठलीही माहिती नाही. आपण निर्णय झाल्यावर अपॉईन्टमेन्ट करतात. ही अपॉईन्टमेन्ट गर्व्हमेंटनी करायला पाहिजे असे आमचे मत आहे की तो निर्णय झालेला आहे की शासनाने तो निर्णय घेतला तर अजून आपण मध्ये जातो. आयदर तुम्ही स्पष्ट करा की ती प्रक्रिया आपल्यालाच करायची आहे. आयदर यु स्पेसिफाय अस की ज्यावेळी होईल त्यावेळी होईल आपल्याला ही नेमणूक करायची आहे.

मा. आयुक्त :-

कॅबीनेटचा निर्णय नंतर झाला आणि शासन निर्णय अजून आलेला नाही. कॅबीनेटमध्ये जर निर्णय झालेला असेल तरी शासन निर्णय जोपर्यंत येत नाही तोपर्यंत ती पद आहेत की नाही ते कन्फमेशन नाही. मात्र ही पद मंजूर झालेली होती आणि मंजूर झालेली पद आपण जाहिरात अगोदर काढलेली असल्यामुळे त्यामध्ये आपण प्रोसेस केलेली आहे.

नरेंद्र मेहता :-

सर चुकीचे आहे. मॅक्झीमम इन्टरव्ह्यू होऊन १५ दिवस पण झालेले नाही. कॅबीनेट निर्णय अगोदर झालेला आहे. असे अनेक विषय आहेत. उदा. फ्लाय ओव्हरचे सांगणार महासभेने मंजूर केले पण सरकारने जसे एम.एम.आर.डी.ए. चे केले आपण थांबलो नाही सरकार करते आपण का खर्च करायचा. ह्या बाबतीत तुम्ही मला हे उत्तर देणार ते कितपर्यंत योग्य आहे. मला सांगा आपण ह्या डॉक्टरला अपॉइन्टमेन्ट केल ती इन्टरव्ह्यू कोणी करायची आणि सिलेक्शन कोणी करायचे त्याबद्दल शासनाने काय गाईडलाईन्स आहेत का? आणि ही कुठली कमिटी फर्म केली आपल्याला ह्या बद्दल माहित आहे का मला माहित नाही. मी उदा. सांगतो मी जी माहिती घेतली हे अपॉइन्ट करायला कमिटीमध्ये कोण-कोण पानपट्टे साहेब ते स्पेशलाइज्ड आहेत ॲनिमलमध्ये म्हणजे जनावर शब्द बरोबर नाही पण ते त्यामध्ये दुसरे म्हसाळ साहेब त्यांचे ह्या डॉक्टरांशी काही संबंध नाही, निपाणे साहेब ऑडिटर त्यांचा ह्या टेक्नीकल सब्जेक्टशी काही संबंध नाही, अजय फाडूले जिल्हा महिला बालकल्याण विकास अधिकारी त्यांचा ह्याच्याशी काही संबंध नाही. आदिवासी प्रकल्प अधिकारी त्यांचा ह्या टेक्नीकल सब्जेक्टशी काही संबंध नाही. साजीद मुसेरी हे अल्पसंख्यांकामधून आपण एक डॉक्टर घेतले. पिडीट्रीशन आहेत साहेब समजून घ्या आपण अपॉइन्टमेन्ट करतो एम.डी. ची पिडीट्रीशन एम.डी.ची अपॉइन्टमेन्ट करायला लागला तर कसे चालेल ह्या डॉक्टरचे निलंबन करावे त्याला बडतर्फ करावे असा नयना मॅडमचा निर्णय आहे कारण ते आपल्या डिस्पेन्सरीत प्रॅक्टीस चालवतात हे सिध्द झाले आहे, डॉक्टर साहेबांना पुराव्यासकट दिले आहे. ह्यांना आपण बडतर्फ करायचे ह्या निर्णयावर आपण पोहोचलो आहेत आणि त्यांना तुम्ही कमिटीमध्ये घेतले आहे. डॉक्टर कांबळे एम.बी.बी.एस. डॉ. जाधव सोडले मला सांगा एम.डी. ची अपॉइन्ट करतो त्याच्या वरच्या पदाची आपण अपॉइन्ट करतो. शिपायांनी डेप्यूटी कमिशनरची अपॉइन्ट करायची तर ह्याचे मिनिंग काय राहिले. अल्पसंख्याक ठिक आहे अपोईन्टमेन्ट करताना कमिटी बघा ना आता विचारले इन्टरव्ह्यू घेतले का तर बोलतात आम्ही इन्टरव्ह्यू घेतले नाही आम्ही सिलेक्शन घेतले. कशा पध्दतीने सिलेक्शन केले त्याचे पासिंग सर्टिफिकेट बघीतले आणि किती वर्षाने काम करतो ते बघीतले आणि देऊन टाकले. मी त्यांना एक सिम्पल प्रश्न विचारला एक एम.डी. १० वर्षापासून गणेश देवल मध्ये डिस्पेन्सरी चालवतो असे गृहीत धरा आणि दूसरा नविन कॉलिफाईड झाला कूठून तरी डिग्री आणली आणि ७ वर्षापासून लिलावती हॉस्पीटलमध्ये प्रॅक्टीस करतो. मोठा सर्जन आहे हे काय बोलतात त्याचे आमचे काय देण घेण नाही तो गणेश देवलवाला त्याचे १० वर्षापासून जुने सर्टिफिकेट आहे. सर असे होते का? नो टेक्नीकनल इन्टरव्ह्यू ते बोलतात इन्टरव्ह्यू घेतलेच नाही सिलेक्शन केले. सिलेक्शन म्हणजे काय त्याला पासिंग मार्क्स २० वर्षाअगोदर किंवा १० वर्षाअगोदर किती भेटलेले. आणि तुला किती वर्ष प्रॅक्टीस करता येईल. ह्याच्यावर डॉक्टर अपॉइन्ट करणार जे रूग्ण तिकडे जाणार त्याच्यावर तो डॉक्टर उपचार करणार आहेत. म्हणजे अशाप्रकारचा उपचार अशाप्रकारे होत असेल तर व्हॉट मेसेज वि आर गिविंग आपल्याकडे तो तज्ञ नसेल तर यु शूड हायर इट. एखाद उदा. सांगतो मा. मुजफ्फर हुसेन चे हॉस्पीटल आहे. आमच्या परिवाराचे हॉस्पीटल आहे तर आम्ही टेक्नीकल पर्सन नाही. आम्ही एखाद्या कन्सल्टंटला अपॉईन्ट केले चार डॉक्टर ला पॅनलवर दिले त्यांना मानधनावर घेतले त्यांनी नियुक्ती करून दिली. आम्ही नियुक्ती केली तर काय होईल. त्या कमिटीमध्ये कोण कोण आहेत बघा ना अशी काय कमिटी होते का? महिला बालकल्याण विकास अधिकारी, ॲडमिनिस्ट्रेटर्स चे निपाणे साहेब, हे फायनन्शीयल ॲगलने ठिक आहे. बाकी इन्टरव्ह्यूसाठी कशाला. देयर इज नो टेक्नीकल स्टाफ, सर एम.डी.पासून करतो तर माझे असे मत आहे की त्यामध्ये तुम्ही तरी असायला पाहिजे. यु आर ऑल्सो देयर इन दॅट कमिटी मग ह्याच्यामध्ये मला सांगा कोणी अपॉईन्ट करायचे. हॉस्पीटलची गरज आहे, डॉक्टरची गरज आहे. पण ह्या पध्दतीने आम्ही एक्सेप्ट नाही करणार ना. ह्याचा खुलासा मला करा. मला पुढच सांगता येईल.

भगवती शर्मा :-

मा. महापौर मॅडम. इसके पहले भी जैसे सन्मा. सदस्य नरेंद्र मेहताजी ने प्रश्न उपस्थित किया था। पिछली बार जो अपॉईन्टमेंट हुई थी, उस समय भी मैने प्रश्न उपस्थित किया था की जब हॉस्पीटल स्टेट गव्हरमेंट को ट्रान्सफर हो रहा है तो हम जो नियुक्तीयॉ कर रहे है। इनको वो कैसे लेंगे कि वा नया स्टाफ लेंगे। कितनो को रखेंगे उनका क्रायटेरिया क्या है? नही तो बाद में प्रॉब्लेम ना हो। तो उस समय भी ये जवाब दिया था हम नियम के तेहत रह करही काम करेंगे उसके अलावा नही करेंगे। दुसरी बात यह होगी की उन्होने बताया था की ये जो कमिटीया है, जो कमिटी बनी जिन्होने उनको अपॉईटमेंट दिया । मा. आयुक्त साहेब मेरा यह कहना है उसके पहले भी और नियुक्तीया हुई है इस हॉस्पीटल के अंदर भी और नियुक्तीया हुई है। क्या उन नियुक्तीयों के समय के अंदर यह जो कमिटी बोले उस कमिटीसे अलग हुई है की इसी टाईप की कमिटीयों में ये व्यक्ती नियुक्त हो कर के उनकी नियुक्ती होती है। तो अगर ऐसी ही नियुक्तीया इन कमिटीयों को अंदर जिसपर इन्होने प्रश्नचिन्ह लगाया अगर किया है। उसके उपर विचार करना चाहिऐ। की उनकी वैधता थी की नही थी। क्योंकी हॉस्पीटल में बहुत नियुक्तीया हुई थी। क्रायटेरिया इसके पहले तय किया था। वो गलत था की आज जो किया जा रहा है। वो गलत है। इसका भी उत्तर दिजिए।

मा. उपायुक्त (मु) :-

सन्मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो सन्मा. सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयाप्रमाणे आपण जी या संदर्भात डॉक्टरांची पद मंजूर होऊन आल्यानंतर जाहिरात काढली होती ती जाहिरात काढल्यानंतर कमिटीचा जो निर्णय आलेला आहे त्याचा कुठे काय अवगत केलेला नाही. म्हणून आपण ह्या इंन्टरव्ह्यू कंडक्ट केल्या होत्या दुसरी गोष्ट वर्ग ३ आणि ४ क आणि ड च्या पदाबद्दल इंटरव्ह्यू घ्यायच्या नाही. त्याची लेखी परिक्षा घ्यायची असे शासनाचे आदेश आहेत वर्ग १ या पदाच्या बाबतीमध्ये शासनाने आयुक्तांनी जी कमिटी निर्माण करतील तशा स्वरूपाचे आदेश आहेत. त्यामुळे आयुक्तांनी जी कमिटी केली आहे त्यामध्ये मागासवर्गीयांची प्रतिनिधी लागतो, रोजगार स्वयंरोजगाराचा प्रतिनिधी लागतो. महिला बालकल्याणचा प्रतिनिधी लागतो आणि डॉक्टरांचे प्रतिनिधी म्हणून आपण वसई-विरार महानगरपालिकेचे डॉक्टर यासाठी मागविलेले होते अशा स्वरूपाची ही कमिटी आपण गठित केली होती. यापूर्वी पण कमिट्या गठित झालेल्या आहेत त्यांच्या अपॉईटमेंट त्याच पध्दतीने झालेल्या आहेत आणि ग्रॅज्यूएशनला आपण ८० टक्के मार्क्स दिले होते पोस्ट ग्रॅज्यूएशनला त्याच्यमध्ये १० मार्क्स दिले होते आणि इंटरव्ह्यूला कोणालाही इंटरव्ह्यूच्यानंतर डिस्क्रीप्शन अस ठेवलेल नव्हत भरती प्रक्रियेमध्ये अनेक स्वरूपाच्या तक्रारी होत असतात. भेदभाव केला जातो. या स्वरूपाच्या नंतर चॅलेज होतात. कोर्टामध्ये ही सगळी प्रक्रिया जाते आणि पद भरली जात नाहीत. यामुळे आपण इंटरव्ह्यूला कुणालाही वेटेज दिलेले नाही. जर महासभेने त्याला मंजूरी नाही दिली तर ही भरती प्रक्रिया रद्द होऊ शकते.

नरेंद्र मेहता :-

सर प्रक्रियेचा विषय नाही माझा विषय होता एखादा अल्पसंख्याक अधिकारी असेल मागासवर्गीय असेल मी उदा. सांगतो. मा. आयुक्त साहेब माझी सभागृहाला विनंती राहील आपण ह्याचे गांर्भियाने विचार करा. या विषयावर मला वाटते हॉस्पीटलमध्ये ह्या सुविधा भेटल्याच पाहिजे. आरोप प्रतिआरोप पण आम्हाला सहन करायचे आहेत. परंतू भविष्यात असे होता कामा नये की आम्ही काहीतरी अपॉईट केल आणि डॉक्टर इकडे करतो तिकडे पण प्रायव्हेट प्रॅक्टीस करतो अशा प्रकारे घटना घडायला नको. तर आपल्याला विनंती राहील की, आपण त्याचा रितसर अन्यथा राखून ठेवा आणि पूर्ण चौकशी करून विषय द्यावा.

मा. आयुक्त :-

याठिकाणी सभागृहाची भावना लक्षात घेऊन जो प्रश्न उपस्थित केला आहे त्या अनुषंगाने खुलासा होणे आवश्यक आहे. मिरा भाईदर महानगरपालिका सेवा प्रवेश सेवांचे वर्गीकरण नियम २०१४ जो शासनाने आपल्याला मंजूर करून दिलेला आहे त्या मंजूरीच्या आदेशान्वये कर्मचारी यांची निवड समिती किंवा त्याची कार्यपध्दती सुध्दा दिलेली आहे. २०१४ सेवाअंतर्गत भरतीसाठी अनुसरावयाची कार्यपध्दती याच्यामध्ये कर्मचारी निवड समिती आहे. या निवडसमितीमध्ये महानगरपालिका पदांवर नियुक्तीकरिता महाराष्ट्र महानगरपालिका कलम ५४ विहित केल्यानुसार कर्मचा-याची निवड समिती गठित करण्यात येईल. त्याप्रमाणे आपण ही निवड समिती गठीत केली आहे या व्यतिरिक्त नामनिर्देशन नियुक्त करताना मागासवर्गीय महिला उमेदवारांचे हितरक्षणासाठी अशा समितीचे सदस्य म्हणून शासनाच्या प्रचलीत आदेशानुसार संबधीत विभागाच्या अधिका-यांना मुलाखतीसाठी विशेष निमंत्रीत करावे. नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नियुक्तीसाठी कर्मचारी निवड समितीची रचना खालीलप्रमाणे आहे. त्याच्यामध्ये आयुक्त किंवा आयुक्तांनी पदनिर्देशीत केलेला अन्य कोणताही अधिकारी ह्या समितीमध्ये इतर काही फील्ड व्हिजीट किंवा मंत्रालयातील मिटींग असल्यामुळे त्याठिकाणी आयुक्ताच्या वतीने उप आयुक्त हेड क्वाटर ह्यांना मी नामनिर्देशीत केलेले होत त्या कमिटीचा अध्यक्ष म्हणून मुख्य लेखा परिक्षक संबधीत विभाग प्रमुख आयुक्तांनी नामनिर्देशीत केलेला अन्य अधिकारी किंवा मागासवर्गीय प्रतिनिधी जिल्हा महिला बालकल्याण अधिकारी जिल्हा समाज कल्याण अधिकारी प्रकल्प अधिकारी अल्पसंख्याक आणि उपायुक्त आस्थापना ही जी समिती आहे ह्या समितीच्या व्यतिरिक्त आपल्याला दूसरी कूठलीही समिती नेमण्याची आवश्यकता नाही आता प्रश्न आहे तो एम.डी. डॉक्टरची निवड करण्याचा विषय असा आहे त्याच्यात एम.डी. चे जे प्रमाणपत्र दिलेले आहे ते विद्यापिठाने

दिलेले आहे त्या विद्यापीठाने दिलेल्या प्रमाणपत्राला त्याच्यात एम.बी.बी.एस. ला पास आहे का? यस मग आपण त्या ह्याच्यामध्ये त्या एम.बी.बी.एस.ला मिळालेले गुण किती आहेत. समजा त्या ६० टक्के मिळाली आणि दूस-या कॅन्डीडेटला ५९ टक्के मिळाले तर मग आपण ६० चा जो आहे त्याला जास्त आहेत म्हणून पात्र धरलेला आहे. त्याच्या पदवीला ६० गुण इव्ह्यालूएट केलेले आहेत. पदव्युत्तर पदवीला एकूण २० गुण दिलेले आहेत त्याच्यामध्ये त्याला किती गुण मिळाले आहेत त्या अनुषंगाने कॅल्क्युलेट केलेले आहेत. त्याच्यानंतर पदव्युत्तर पदवीका म्हणजे अजुन एखादा डिप्लोमा असेल तर त्याला आपण १० गुण दिलेले आहेत. अनुभवाला १० गुण दिलेले आहेत. अशाप्रकारे कॅल्क्यूलेशन करून ह्याच्यामध्ये कूठल्याही प्रकारचे कन्फुजन न ठेवता त्याच्यामध्ये जास्तीत जास्त ट्रान्सफन्सी राहील अलगेशनला वाव मिळू नये म्हणून आपण ही कार्यपध्दती ह्याठिकाणी वापरली आहे. ह्या कार्यपध्दतीनुसार मेरीटप्रमाणे जे कागदपत्रे ओपन आहेत. ह्या तुम्हाला वाटत असेल तर सांगा की ह्याच्यामध्ये मिस युज झालेले आहेत किंवा हेतू पूरस्पर काही प्रॉब्लेम केलेले आहेत तर आपण परत एकदा तपासून घेऊ. परंतू ही भरती करत असताना इब्राहिम अली ज्या डॉक्टरची अपॉइन्टमेन्ट केलेली होती ज्यावेळेस आढावा घेतला त्यावेळी आरोग्य विभागाच्या आढाव्यामध्ये स्पेशल ती रीघ दोन्ही हॉस्पीटलना भेटी दिल्या तेथे पेशन्टची रीघ बघीतली लोकांची डिमांड बघीतली म्हणून तातडीने डॉक्टर देणे गरजेचे आहे हे मला आयुक्त ह्या नात्याने वाटली म्हणून हे तातडीने इन्टरव्ह्यू लागलेले आहेत ते अत्यावश्यक सेवा म्हणून आपल्याला डॉक्टर मिळत नव्हते पण आपण त्यांना इनव्हाईट केले बोलवले. २-३ वेळेस इन्टरव्ह्यूला बोलावले तर कोणी आले नाही ह्यावेळेस आपण खास करून प्रयत्न केले होते आणि लोकांना बोलवून घेतले त्याच्यात ६०-६५ लोक वॉकींग इन्टरव्ह्यूसाठी आले होते हे किती दिवस राहतील ही सुध्दा शंका आहे मी ज्यावेळेस टेंभा हॉस्पीटलला गेलो तिथे प्रायव्हेट हॉस्पीटलची लोक २-२ तास बसून आपल्या पेशन्टला सुविधा देतात. किंवा तपासणी करतात परंतू परमनट आपल्याकडे यावा. आपण पिडीॲट्रीक वॉर्ड मध्ये सर्व सुविधा घेऊन ठेवल्या आहेत. म्हणजे तेथे आय सी यू, पी आय सी यु, एन आय सी यु करीता इन्स्ट्रूमेन्ट घेऊन ठेवली आहेत. परंतू डॉक्टर नसल्यामुळे वॉर्ड चालवता येत नाही. म्हणून डॉक्टर अव्हेलेबल करून घेण्याचा आयुक्तांचा आणि प्रशासनाचा प्रयत्न आहे. आता डी.एम.सी. चे कॉलीफिकेशन किंवा इजिंनियर किंवा डॉक्टर तसे पाहिले तर मी सुध्दा जनावराचाच डॉक्टर आहे. मी एम.डी. चे इन्टरव्ह्यू घेऊ शकणार नाही. परंतू आयुक्त म्हणून मला तिथे इन्टरव्ह्यूला अधिकार आहे. तसे डी.एम.सी किंवा सी.ई.ओ. ह्याच्यामध्ये एम.सी.ए चे दिलेले आहे. मुख्य लेखा परिक्षक हे डेझीग्नेशन म्हटलेले आहे. लेखापरिक्षक म्हणून तिथे परिक्षेला मेंबर असावा म्हणून तिथे इन्टरव्ह्यूला मेंबर आहेत त्याचा लेखापरिक्षक किंवा मेडीकल ऑफिसर म्हणून डॉक्टर जाधवाला बोलवले होते. त्यांना ॲनलिसेस करायचे नाही त्यांचे ॲनलिसेस करायचे म्हणजे त्याची डीग्री तपासायची त्यांचा अनुभव तपासायचा आणि त्यांना कामावर घेण्यासाठी निवड करायची आहे. आणि निवड समिती आहे. हा म्हणजे प्रशासनाची भुमिका ह्याठिकाणी समोर ठेवलेली आहे आपण ह्यावर यथायोग्य निर्णय घ्यावा.

नरेंद्र मेहता :-

मा. आयुक्तसाहेब आम्ही पहिलेच सांगितले की व्हायलाच पाहिजे कारण हे आम्हालाच भोगायला लागेल आपण जे सांगितले की इन जनरल कर्मचा-याच्या नियुक्तीसाठी ती कमिटी आहे.

मा. आयुक्त :-

नाही ते सगळ्यासाठी आहे.

नरेंद्र मेहता :-

मला तेच सांगायचे आहे की एखादा १००० स्टाफ अपॉईन्ट करतो तर ९०० स्टाफ वेगवेगळ्या विभागातला असतो त्यामध्ये कोणत्याही मनुष्याच्या जिवनाशी काही देण घेण नाही रस्ता असेल, इंजिनियर असेल, साफ सफाई असेल आरोग्य असतील व्हेन व्ही आय अपोईन्टींग द डॉक्टर कॉलीफाय त्यावेळी आपल्याकडे हे नसतील तर कुठल्यातरी आपल्या सरकारी हॉस्पीटलमधून तुम्हाला त्यांना बोलवायला पाहिजे. तुम्ही ह्या कमिटीतून निर्णय घ्यावा पण .................

मा. आयुक्तः-

आपण त्याची ना लेखी परिक्षा घेतली ना त्यांना टेक्नीकल प्रश्न विचारले आहेत आपण त्याचं फक्त त्याची डीग्री बघीतली.

नरेंद्र मेहता :-

मला एक सांगा एका व्यक्तीने तुम्ही अनुभवाचे १० मार्क्स सांगितले मी डॉक्टर आहे १० वर्षापासून १० ऑपरेशन केले हे ५ वर्षापासून आहेत १००० ऑपरेशन केले तुम्ही कोणाला घेणार?

मा. आयुक्त :-

किती वर्ष केले हा अनुभव आहे.

नरेंद्र मेहता :-

कोणाचा अनुभव जास्त आहे.

मा. आयुक्त :-

मी आपल्याला क्रायटेरीया सांगतो की ह्या ठिकाणी वर्षाचे हे केलेले आहे. क्रायटेरीयामध्ये आपल्याला चेंज करायला लागेल तो क्रायटेरीया तुम्ही अनुभवाचे म्हटले ऑपरेशन क्रायटेरीया नंबर ऑफ ऑपरेशन हा क्रायटेरीया नव्हता आपण ड्यूरेशन पिरेड त्याठिकाणी केलेले होते. म्हणून तो पिरेड लक्षात

घेऊन आपण लक्षात घ्यावे तुमची भावना लक्षात आली वेगळ्या डॉक्टरनी त्याचा इन्टरव्ह्यू कसा घ्यायचा कायदेशीर रित्या ते डी.एम.सी. म्हणून मेंबर आहेत.

नरेंद्र मेहता :-

सर आपण रस्ता जरी बनवतो किंवा एखादा गटर,नाला, ब्रिज आपल्याकडे तज्ञ नसतात आपण एक कन्सल्टंट अपॉईन्ट करतो. करोडो रू. फी देतो. गार्डन जरी लॅन्ड स्केपींग करायचे असेल आपण कन्सल्टट अपॉईन्ट करतो. इकडे आपल्याला लोकांच्या जीवनाचा प्रश्न आहे. आपण बोलत नाही हेच क्रायटेरीया..................

मा. आयुक्त :-

साहेब, माझी नम्र विनंती आहे आपण ह्याठिकाणी आपण कूठलेही टेक्नीकल प्रश्न त्यांना विचारले नाहीत. कूठल्याही प्रकारची टेक्नीकल लेखी परिक्षा घेतलेली नाही. त्याचे डीग्री सर्टिफिकेट बघीतले आणि मेरीट बघीतले आणि त्या मेरीटप्रमाणे त्याला घेतलेले आहे.

नयना वसाणी :-

बीईग अ मेडीकल प्रॅक्टीशनर मला एवढच बोलायचे आहे की तुम्ही ह्या कमिटीमध्ये आम्ही त्या व्यक्तीच्या आम्ही सस्पेशनसाठी मागणी केली आहे त्याच्यावर गुन्हा दाखल केला त्याला तुम्ही कसे घेतले. त्याच्यातले डॉ. फूलझेले त्यांनी दोन दिवसाआधी एक घोळ केलेला आहे. इंदिरा गांधी हॉस्पीटलमधून डिलीव्हरी झालेले एक बाळ आहे ते दोन दिवसाचे बाळ रस्त्यावर सापडले. ती डिलीव्हरी आपल्याकडे झाली पण डॉ. फूलझेले पोलिसपासून हाईड केले आहे. पत्रकारापासून पण हाईड केले आहे. असे अपराध केलेल्या डॉक्टरना आपण कमिटीवर कसे घेऊ शकतो.

मा. आयुक्त :-

अपराध केला ही आपली तक्रार आहे. त्याची चौकशी होईल.

नयना वसाणी :-

साहेब प्रूफ दिलेला आहे. हा विषय गेले चार महिने रखडतो.

मा. आयुक्त :-

अपराध केल्याचा विषयावर चौकशी होईल व त्याच्यावर ॲक्शन होईल. सध्या तो दोषी आहे का तो कामावर आहे.

नयना वसाणी :-

४-४ महिने लागतात का?

नरेंद्र मेहता :-

आपण असे कसे म्हणता उद्या चौकशी नंतर दोषी सापडला.

मा. आयुक्त :-

त्याच्यानंतर दोष सापडला. पण आता नाही आता नाही ना.

नरेंद्र मेहता :-

असे गृहीत धरा दोषी सापडल्यानंतर ह्या लोकांना काय करणार?

नयना वसाणी :-

सर चार महिण्यापासून हा मुद्दा आहे. म्हसाळ साहेब घेत नाही सारखे मला सांगण्यात येते की डिपार्टमेन्टल इन्कावयरी चालू आहे.

मा. आयुक्त :-

आपण महानगरपालिकेच्या समोर ठराव ठेवलेला आहे. आपल्याला योग्य वाटत असेल तर करा नाहीतर करू नका. परंतू त्यामध्ये महत्वाची गोष्ट आज तो कामावर आहे तो काम करतो मी त्याला अपॉईन्ट केलेले आहे. तो आयुक्तांचा अधिकार आहे. आयुक्ताचा अधिकार मी वापरला.

नरेंद्र मेहता :-

मा. महापौर मॅडम विषय राखून ठेवावा .विषय रितसर आणावा.

(सभागृहात गोंधळ)

भगवती शर्मा :-

मॅडम शहर के जनजीवन का सवाल है। स्वास्थ्य का सवाल है। आयुक्त ने प्रत्येक रूपमें...............

मा. आयुक्त :-

मा. महापौर मॅडम मी ह्याच्यात असे सांगेन की ह्या ठिकाणी आम्ही २१-२२ पदांना मान्यता दिली होती फक्त ११ मिळाले आहेत. आपल्या महानगरपालिकेमध्ये लोक येत नाहीत. ह्याठिकाणी ठराव कॅन्सल करायचा किंवा पूढे ढकलायचा असेल तर ढकला.

ध्रुवकिशोर पाटील :-

मा. महापौर मॅडम ह्याठिकाणी मा.आयुक्तांनी आपल्याला कळकळीची विनंती केली आहे. मा. आयुक्तानी तुम्हाला वस्तूस्थिती सादर केलेली आहे. की आपल्या महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये,

ओ.पी.डी. मध्ये किती पेशन्ट येतात आणि त्यांना अत्यावश्यक बाब आहे आणि त्यांनी ती निर्दशनास आणल्या नंतर त्यांनी हा प्रस्ताव आणलेला आहे. ताबडतोब इन्टरव्ह्यू झालेल्या आहेत. आपले नशीब चांगले की चांगले डॉक्टर अव्हेलेबल झाले आहेत. आपण ह्याची निवड केली नाही तर डॉक्टर येणार नाहीत.

जुबेर इनामदार :-

ध्रुवजी अपना ठराव पढीए इस शहर में डॉक्टर की जरूरत है। जल्दसे जल्द हॉस्पीटल चालू करना है।

नयना वसाणी :-

वो डॉक्टर दूसरी जगह प्रॅक्टीस करते है नुकसान होगा तो आपको चलेगा।

जुबेर इनामदार :-

तुम्ही जिथून निवडून येता तिकडे पालिकेच्या हॉस्पीटलची डॉक्टरची जास्त गरज आहे.

अनिल भोसले :-

पगार सरकार देणार प्रायव्हेट देणार आहे का?

(सभागृहात गोधळ)

जुबेर इनामदार :-

तुम्ही त्यांची तक्रार केली आहे ना मग प्रशासन बघेल.

भगवती शर्मा :-

भोसले जी आरोप प्रत्यारोप कैसे लगते है आरोप वहॉ पे भी लगा था लेकीन जॉच में सिध्द नही होता।

जुबेर इनामदार :-

भगवतीजी जिन नगरसेवक को ॲन्टीकरप्शनने पकडा था वो भी आज सभागृह में है की नही। दोष सिध्द किधर हूआ है दोषी अधिकारी है उसपर कारवाई होनी चाहिए।

लियाकत शेख (विरोधी पक्षनेता ):-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वैद्यकीय सेवा या संवर्गातील रिक्त जागा थेट मुलाखतीद्वारे (Walk In Selection) भरणेबाबत दि. २०/०९/२०१६ रोजी दै. लोकमत, दै. द फ्री प्रेस जरनल, साप्ताहिक पुकार, साप्ताहिक परशुराम समाचार वृत्तपत्रात वैद्यकीय संवर्गातील स्थायी वैद्यकीय अधिकारी (वर्ग-०१) या पदाकरीता जाहिरात तसेच महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

दि.१४/१०/२०१६ रोजी निवड समितीने शैक्षणिक गुणवत्तेच्या गुणानुक्रमाने पात्र उमेदवारांची निवड व प्रतिक्षा यादी तयार केलेली आहे. सदरची निवड व प्रतिक्षा यादी दि.१४/१०/२०१६ रोजी महानगरपालिकेच्या नोटीस बोर्डावर तसेच संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. निवड व प्रतिक्षा यादीमधील पात्र उमेदवारांची नावे खालीलप्रमाणे आहे.

निवड यादी

| अ.क्र. | निवड झालेल्या उमेदवारांचे नाव | पद | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १. | डॉ.पाटील राहुल वासुदेव | वैद्यकीय अधिकारी (स्त्री रोग व प्रसुती तज्ञ) (वेतनश्रेणी - १५६००-३९१०० ग्रे.पे.६६००) | खुला |
| प्रतिक्षा यादी | | | |
| १. | डॉ. बोडके अभिजीत भास्कर | वैद्यकीय अधिकारी (स्त्री रोग व प्रसुती तज्ञ) (वेतनश्रेणी - १५६००-३९१०० ग्रे.पे.६६००) | खुला |
| निवड यादी | | | |
| १. | डॉ.शिरोळकर मुकूंद सुधीर | वैद्यकीय अधिकारी (बालरोग तज्ञ) (वेतनश्रेणी - १५६००-३९१०० ग्रे.पे.६६००) | खुला |
| निवड यादी | | | |
| १. | डॉ. पागार निता रघूनाथ | बधिरिकरण शास्त्रज्ञ (वेतनश्रेणी - १५६००-३९१०० ग्रे.पे.६६००) | खुला |
| निवड यादी | | | |
| १ | डॉ.पटेल रुचि ब्रिजेश | शरीर विकृती चिकित्सक (वेतनश्रेणी -१५६००-३९१०० ग्रे.पे.६६००) | खुला |
| प्रतिक्षा यादी | | | |
| १ | डॉ. सुर्यवंशी वैशाली तुळशिराम | शरीर विकृती चिकित्सक (वेतनश्रेणी -१५६००-३९१०० ग्रे.पे.६६००) | खुला |

| निवड यादी | | | |
|---|---|---|---|
| १. | डॉ. धुरी चैताली विजय | मनोविकृती चिकित्सक (वेतनश्रेणी - १५६००-३९१०० ग्रे.पे.६६००) | खुला |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रतिक्षा यादी | | | |
| १. | डॉ.गंभीरे धनंजय देवीदास | मनोविकृती चिकित्सक (वेतनश्रेणी - १५६००-३९१०० ग्रे.पे.६६००) | खुला |
| निवड यादी | | | |
| १. | डॉ.सरोदे दीपिका अनिल | वैद्यकीय अधिकारी (चर्मरोग) (वेतनश्रेणी -१५६००-३९१०० ग्रे.पे.६६००) | खुला |
| निवड यादी | | | |
| १. | डॉ.पवार ग्रंथाली आत्माराम | नेत्रशल्य चिकित्सक (वेतनश्रेणी - १५६००-३९१०० ग्रे.पे.६६००) | खुला |
| प्रतिक्षा यादी | | | |
| १ | डॉ.निखाते शशिकांत शामराव | नेत्रशल्य चिकित्सक (वेतनश्रेणी - १५६००-३९१०० ग्रे.पे.६६००) | खुला |
| निवड यादी | | | |
| १. | डॉ. पाल संगमलाल ब्रिजभान | वैद्यकीय अधिकारी (कान,नाक,घसा तज्ञ) (वेतनश्रेणी - १५६००-३९१०० ग्रे.पे.६६००) | खुला |
| निवड यादी | | | |
| १ | डॉ.संपट समिर विनोद | दंतशल्य चिकित्सक (वेतनश्रेणी - १५६००-३९१०० ग्रे.पे.५४००) | खुला |
| प्रतिक्षा यादी | | | |
| १ | डॉ. नापंडा मानसी राजेश | दंतशल्य चिकित्सक (वेतनश्रेणी - १५६००-३९१०० ग्रे.पे.५४००) | खुला |
| २ | डॉ.बंसल रितिका संदीप | दंतशल्य चिकित्सक (वेतनश्रेणी - १५६००-३९१०० ग्रे.पे.५४००) | खुला |
| ३ | डॉ.राठोड पंकज अशोक | दंतशल्य चिकित्सक (वेतनश्रेणी - १५६००-३९१०० ग्रे.पे.५४००) | खुला |
| निवड यादी | | | |
| १. | डॉ. पाटील मृदुल संजय | वैद्यकीय अधिकारी (वेतनश्रेणी - १५६००-३९१०० ग्रे.पे.५४००) | खुला |
| २. | डॉ. लोढे सूर्यकांत तेजराव | वैद्यकीय अधिकारी (वेतनश्रेणी - १५६००-३९१०० ग्रे.पे.५४००) | इ.मा.व. |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५३(१) नुसार ''महानगरपालिकेचा जो अधिकारी सहा.आयुक्त या पदाशी समतुल्य असलेले किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे. मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकेकडे निहित असेल'' अशी तरतुद आहे. उपरोक्त पदे ही वर्ग-०१ या संवर्गातील आहेत. त्यामुळे सदर पदावर उमेदवार नियुक्ती करणेस मा.महासभेची मंजूरी असणे आवश्यक आहे.

तथापी मा.उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये भारतरत्न पंडीत भिमसेन जोशी रुग्णालय त्वरीत सुरु करावयाचे आहे. त्यामुळे वरील निवड व प्रतिक्षा यादीतील उमेदवार वैद्यकीय अधिकारी (वर्ग-०१) या संवर्गातील असल्यामुळे त्यांचे नियुक्तीस मान्यता देण्यात येत आहे.

जुबेर इनामदार :-

माझे अनुमोदन आहे.

मर्लिन डिसा :-

मॅडम तुमच्या परवानगीने बोलते, मिरा भाईदरमध्ये इंदिरा गांधी रूग्णालय इथे एकच गायनॉलॉजिकल डिपार्टमेन्ट आहे. ॲन्ड इटस व्हेरी इम्पोर्टन्ट हॅव अ एम.डी. टू टेक केअर ऑफ पेशंट सो प्लीज लेट द ॲडमिनिस्ट्रेटीव्ह टू टेक द डिसीजन डू अपॉइन्ट द राईट डॉक्टर ही माझी सुचना म्हणून घ्यावी.

सय्यद नुरजहॉ नझर हुसैन :-

माझे अनुमोदन आहे.

नरेंद्र मेहता :-

मा. आयुक्त यांनी शासनाच्या निर्णयाची पूर्ण माहिती घेवून फेर सादर करा असा ठराव मांडत आहे.

शरद पाटील :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

दोन ठराव आले आहेत मतदानाला घ्या.

नगरसचिव :-

प्रकरण क्र ९० करिता दोन ठराव आले आहेत पहिला ठराव लियाकत शेख आणि अनुमोदन जुबेर इनामदार ह्या ठरावात सुचना आहे सुचक मर्लिन डिसा अनुमोदन नुरजहॉं नझर हुसैन. दूसरा ठराव सुचक नरेंद्र मेहता अनुमोदन शरद पाटील प्रथम मी दूसरा ठराव मतदानास टाकतो

ध्रुवकिशोर पाटील :-

सचिव साहेब दोन सदस्यांनी आता एन्ट्री मारली. तुमचे इलेक्शन सुरू आहे. तर त्या दोन सदस्यांना घेऊ नका.

(सभागृहात गोंधळ)

जुबेर इनामदार :-

सचिव महोदय प्रक्रिया सुरू झालेली आहे.

नगरसचिव :-

नोंद घेतली आहे. सुचक नरेंद्र मेहता ह्यांच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी आहेत का? सुचक लियाकत शेख ह्यांच्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी आहेत का?

मा. महापौर :-

सुचक श्री. लियाकत शेख ह्याच्या बाजूने ३८ विरोधात २५ तटस्थ १ इतकी मत पडली आहेत. लियाकत शेख ह्यांनी मांडलेला ठराव बहूमताने मंजूर करण्यात येत आहे.

प्रकरण क्र. ९० :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर वैद्यकिय संवर्गातील निवड यादीतील वैद्यकिय अधिकारी (वर्ग-०१) या पदाकरीता उमेदवारांना नियुक्ती आदेश देणेबाबत.

ठराव क्र. ९० :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वैद्यकीय सेवा या संवर्गातील रिक्त जागा थेट मुलाखतीद्वारे (Walk In Selection) भरणेबाबत दि. २०/०९/२०१६ रोजी दै. लोकमत, दै. द फ्री प्रेस जरनल, साप्ताहिक पुकार, साप्ताहिक परशुराम समाचार वृत्तपत्रात वैद्यकीय संवर्गातील स्थायी वैद्यकीय अधिकारी (वर्ग-०१) या पदाकरीता जाहिरात तसेच महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

दि.१४/१०/२०१६ रोजी निवड समितीने शैक्षणिक गुणवत्तेच्या गुणानुक्रमाने पात्र उमेदवारांची निवड व प्रतिक्षा यादी तयार केलेली आहे. सदरची निवड व प्रतिक्षा यादी दि.१४/१०/२०१६ रोजी महानगरपालिकेच्या नोटीस बोर्डावर तसेच संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. निवड व प्रतिक्षा यादीमधील पात्र उमेदवारांची नावे खालीलप्रमाणे आहे.

निवड यादी

| अ.क्र. | निवड झालेल्या उमेदवारांचे नाव | पद | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १. | डॉ.पाटील राहुल वासुदेव | वैद्यकीय अधिकारी (स्त्री रोग व प्रसुती तज्ञ)<br>(वेतनश्रेणी - १५६००-३९१०० ग्रे.पे.६६००) | खुला |
| | | प्रतिक्षा यादी | |
| १. | डॉ. बोडके अभिजीत भास्कर | वैद्यकीय अधिकारी (स्त्री रोग व प्रसुती तज्ञ)<br>(वेतनश्रेणी - १५६००-३९१०० ग्रे.पे.६६००) | खुला |
| | | निवड यादी | |
| १. | डॉ.शिरोळकर मुकूंद सुधीर | वैद्यकीय अधिकारी (बालरोग तज्ञ)<br>(वेतनश्रेणी - १५६००-३९१०० ग्रे.पे.६६००) | खुला |
| | | निवड यादी | |
| १. | डॉ. पागार निता रघूनाथ | बधिरिकरण शास्त्रज्ञ<br>(वेतनश्रेणी - १५६००-३९१०० ग्रे.पे.६६००) | खुला |
| | | निवड यादी | |
| १ | डॉ.पटेल रुचि ब्रिजेश | शरीर विकृती चिकित्सक<br>(वेतनश्रेणी -१५६००-३९१०० ग्रे.पे.६६००) | खुला |
| | | प्रतिक्षा यादी | |
| १ | डॉ. सुर्यवंशी वैशाली तुळशिराम | शरीर विकृती चिकित्सक<br>(वेतनश्रेणी -१५६००-३९१०० ग्रे.पे.६६००) | खुला |

| निवड यादी |
|---|

| | | | |
|---|---|---|---|
| १. | डॉ. धुरी चैताली विजय | मनोविकृती चिकित्सक (वेतनश्रेणी - १५६००-३९१०० ग्रे.पे.६६००) | खुला |
| | | **<u>प्रतिक्षा यादी</u>** | |
| १. | डॉ.गंभीरे धनंजय देवीदास | मनोविकृती चिकित्सक (वेतनश्रेणी - १५६००-३९१०० ग्रे.पे.६६००) | खुला |
| | | **<u>निवड यादी</u>** | |
| १. | डॉ.सरोदे दीपिका अनिल | वैद्यकीय अधिकारी (चर्मरोग) (वेतनश्रेणी -१५६००-३९१०० ग्रे.पे.६६००) | खुला |
| | | **<u>निवड यादी</u>** | |
| १. | डॉ.पवार ग्रंथाली आत्माराम | नेत्रशल्य चिकित्सक (वेतनश्रेणी - १५६००-३९१०० ग्रे.पे.६६००) | खुला |
| | | **<u>प्रतिक्षा यादी</u>** | |
| १ | डॉ.निखाते शशिकांत शामराव | नेत्रशल्य चिकित्सक (वेतनश्रेणी - १५६००-३९१०० ग्रे.पे.६६००) | खुला |
| | | **<u>निवड यादी</u>** | |
| १. | डॉ. पाल संगमलाल ब्रिजभान | वैद्यकीय अधिकारी (कान,नाक,घसा तज्ञ) (वेतनश्रेणी - १५६००-३९१०० ग्रे.पे.६६००) | खुला |
| | | **<u>निवड यादी</u>** | |
| १ | डॉ.संपट समिर विनोद | दंतशल्य चिकित्सक (वेतनश्रेणी - १५६००-३९१०० ग्रे.पे.५४००) | खुला |
| | | **<u>प्रतिक्षा यादी</u>** | |
| १ | डॉ. नापंडा मानसी राजेश | दंतशल्य चिकित्सक (वेतनश्रेणी - १५६००-३९१०० ग्रे.पे.५४००) | खुला |
| २ | डॉ.बंसल रितिका संदीप | दंतशल्य चिकित्सक (वेतनश्रेणी - १५६००-३९१०० ग्रे.पे.५४००) | खुला |
| ३ | डॉ.राठोड पंकज अशोक | दंतशल्य चिकित्सक (वेतनश्रेणी - १५६००-३९१०० ग्रे.पे.५४००) | खुला |
| | | **<u>निवड यादी</u>** | |
| १. | डॉ. पाटील मृदुल संजय | वैद्यकीय अधिकारी (वेतनश्रेणी - १५६००-३९१०० ग्रे.पे.५४००) | खुला |
| २. | डॉ. लोढे सूर्यकांत तेजराव | वैद्यकीय अधिकारी (वेतनश्रेणी - १५६००-३९१०० ग्रे.पे.५४००) | इ.मा.व. |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५३(१) नुसार "महानगरपालिकेचा जो अधिकारी सहा.आयुक्त या पदाशी समतुल्य असलेले किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे. मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकेकडे निहित असेल" अशी तरतुद आहे. उपरोक्त पदे ही वर्ग-०१ या संवर्गातील आहेत. त्यामुळे सदर पदावर उमेदवार नियुक्ती करणेस मा.महासभेची मंजूरी असणे आवश्यक आहे.

तथापी मा.उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये भारतरत्न पंडीत भिमसेन जोशी रुग्णालय त्वरीत सुरु करावयाचे आहे. त्यामुळे वरील निवड व प्रतिक्षा यादीतील उमेदवार वैद्यकीय अधिकारी (वर्ग-०१) या संवर्गातील असल्यामुळे त्यांचे नियुक्तीस मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- श्री. लियाकत शेख अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार

सदर ठरावामध्ये सुचक श्रीम. मर्लिन डिसा व अनुमोदक श्रीम. सय्यद नुरजहॉ नझर हुसैन यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.

मिरारोड येथील इंदिरा गांधी रुग्णालयात प्रसुती विभागात अतिरिक्त प्रसुती तज्ञाची गरज असल्याने त्याकरीता योग्य उपाययोजना मा. आयुक्तांनी करावी अशी मी सुचना मांडत आहे.

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | कॅटलीन ॲन्थोनी परेरा | १ | मेहता नरेंद्र लालचंद | दळवी प्रशांत ज्ञानदेव |
| २ | सय्यद नुरजहॉ नझर हुसैन | २ | शरद केशव पाटील | |
| ३ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | ३ | पाटील रोहिदास शंकर | |
| ४ | डिमेला बर्नट अल्बर्ट | ४ | म्हात्रे कल्पना महेश | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | भावसार शिल्पा कमलेश | ५ | भानुशाली वर्षा गिरीधर | |
| ६ | शबनम लियाकत शेख | ६ | कोठारी सुमन रमेश | |
| ७ | प्रभात प्रकाश पाटील | ७ | डॉ. नयना मनोज वसाणी | |
| ८ | पाटील सुनिता कैलास | ८ | जैन गिता भरत | |
| ९ | झिनत रऊफ कुरेशी | ९ | शर्मा सुनिला सत्येंद्र | |
| १० | पुजारी कांचना शेखर | १० | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | |
| ११ | पिसाळ मनिषा नामदेव | ११ | सुजाता रविकांत शिंदे | |
| १२ | डिसा मर्लिन मर्विन | १२ | पाटील प्रेमनाथ गजानन | |
| १३ | वंदना रामदास चक्रे | १३ | सिंग मदन उदितनारायण | |
| १४ | अनिता जयवंत पाटील | १४ | कांगणे यशवंत ठकाजी | |
| १५ | गोविंद हेलन जॉर्जी | १५ | अनिल बाबुराव भोसले | |
| १६ | इनामदार जुबेर | १६ | कासोदरीया अश्विन श्यामजी | |
| १७ | वेतोसकर राजेश शंकर | १७ | जैन दिनेश तेजराज | |
| १८ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | १८ | जैन रमेश धरमचंद | |
| १९ | सामंत प्रमोद जयराम | १९ | शाह राकेश रतिशचंद्र | |
| २० | खंडेलवाल सुरेश | २० | भोईर भावना राजु | |
| २१ | लियाकत ग. शेख | २१ | भोईर राजु यशवंत | |
| २२ | नरेश तुकाराम पाटील | २२ | जाधव मोहन महादेव | |
| २३ | भोईर कमलेश यशवंत | २३ | मुन्ना सिंग | |
| २४ | वंदना मंगेश पाटील | २४ | रवि व्यास | |
| २५ | तारा विनायक घरत | २५ | मयेकर सरस्वती रजनकांत | |
| २६ | शुभांगी महिन कोटियन | | | |
| २७ | जयमाला किशोर पाटील | | | |
| २८ | परमार अनिता भरत | | | |
| २९ | पाटील प्रणाली संदिप | | | |
| ३० | गावंड मंदाकिणी आत्माराम | | | |
| ३१ | संध्या प्रफुल्ल पाटील | | | |
| ३२ | म्हात्रे प्रभाकर पद्माकर | | | |
| ३३ | संदिप मोहन पाटील | | | |
| ३४ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | | | |
| ३५ | प्रविण मोरेश्वर पाटील | | | |
| ३६ | ठाकुर अरविंद दत्ताराम | | | |
| ३७ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | | | |

ठराव सुचनेसह बहुमताने मंजूर

सही /-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ९१, महापौर चषक आयोजनाकरिता आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणे.

शरद पाटील :-

मिरा भाईंदर महानगरपालिका शहरातील विविध शाळा, विद्यालय, महाविद्यालयातील होतकरु खेळाडूंच्या सुप्त गुणांना प्रोत्साहन मिळावे तसेच सदर खेळांडूना एक नविन व्यासपीठ उपलब्ध होऊन त्यामधील काही खेळाडू पुढे येऊन राज्य, राष्ट्रीय तसेच जागतिक स्तरावर आपले, आपल्या शहराचे नाव लौकीक करतील या हेतूने मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत महापौर चषक स्पर्धांसाठी खालील स्पर्धाचे आयोजन १२ वर्षाखालील, १४ वर्षाखालील, १७ वर्षाखालील व १९ वर्षाखालील मुलांमुलींसाठी करावयाचे आहे.

| | | |
|---|---|---|
| कबड्डी | खो-खो | रस्सीखेच |
| व्हॉली बॉल | फुटबॉल | लंगडी |
| क्रिकेट | स्विमिंग | बॅडमिंटन |
| धावणे | कुस्ती | कॅरम |
| बुध्दीबळ | | |

त्यानुसार ''महापौर चषक'' स्पर्धेचे आयोजन करण्यासाठी व त्यासाठी येणाऱ्या खर्चास रु.७० लाख खर्च अपेक्षित आहे. सदर महापौर चषक – २०१६ या स्पर्धेचे आयोजन करण्यासाठी सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकामध्ये रु.७५ लाख ची तरतुद करण्यात आलेली आहे.

तरी ''महापौर चषक'' स्पर्धेसाठी येणाऱ्या सर्व खर्चासाठी आर्थिक व प्रशासकीय मंजुरी तसेच ''महापौर चषक'' स्पर्धेमध्ये खेळाबाबत वेळोवेळी आवश्यक ते बदल करणे आयोजन व नियोजन करणेकामीचे सर्व अधिकार हि सभा मा. आयुक्त यांना प्रदान करीत आहे असा मी ठराव करीत आहे.

राकेश शहा :-

माझे अनुमोदन आहे.

प्रमोद सामंत :-

मा. महापौर मॅडम शहरामध्ये महापौर चषक होते गेल्यावर्षी पण झाले. आपण ह्यामध्ये इनेशेटीव्ह घेतली म्हणून आम्ही आपले आभारी आहोत. गेल्यावर्षी जो खर्च झाला होता त्यामध्ये एक बाब मला खटकते. त्यामध्ये मंडप आणि स्टेज बांधण्याकरिता आपल्या एकूण बजेटपैकी ४० टक्के खर्च झालेला आहे. आपण खेळाला प्रोत्साहन द्यायला निघालो आहेत मंडप आणि स्टेजसाठी ३० ते ४० लाख खर्च होत असेल ह्यावर्षी हा खर्च कदाचीत वाढेल. मा. आयुक्तसाहेब हा विषय असा आहे. महापौर मॅडम नी इनेशेटीव्ह घेतली आहे. सभागृहाने मान्यता दिली आहे. ह्यावर्षीपण मान्यता ठराव झालेला आहे. आम्हाला विरोधात ठराव करायचा नाही. पण माझी सुचना आहे की ह्या खेळाला प्रोत्साहन देताना त्यामध्ये मंडप आणि स्टेज ह्या गोष्टीवरती ४० टक्के खर्च होतो आणि हा चषक गेल्यावेळेला घाईघाईत झाला होता. अधिकाऱ्यांनी कसे प्लांनिग केलेले माहित नाही. हा चषक ऑक्टोबर महिण्यात मंजूरी देतो तर किमान तीन महिने तरी शाळाला दिले पाहिजे. तीन महिन्या अगोदर शाळांना माहिती गेली पाहिजे. तीन महिन्यात शाळांना प्रशिक्षण घेतले पाहिजे त्यानंतर ह्या स्पर्धा झाल्या पाहिजेत. दूसरा मूद्दा असा होता की गेल्यावेळेला आम्हाला कळलेले आम्ही जास्त इनव्हॉल्व नव्हतो आम्ही पोहोचलो पण नव्हतो एकच दिवस आलो होतो की आपण काही सामने घेतलेले त्याच्यात प्रायव्हेट क्लबना पार्टिसिपेशन दिलेले तर शाळांचे स्पर्धा घेताना किंवा शाळामध्ये कॉम्पीटेशन करताना प्रायव्हेट क्लबना त्याठिकाणी एन्ट्री दिली. किंवा त्यामध्ये खेळायला मुभा दिली तर ते कॉम्पीटेशन प्रॉपर राहणार नाही. प्रायव्हेट क्लबना इथे एन्टरटेन करायचे असेल मग प्रायव्हेट क्लब साठी वेगळी टूर्नामेन्ट करा आणि शाळासाठी वेगळी स्पर्धा करा.

प्रेमनाथ पाटील :-

मा. महापौर मॅडम गटनेत्यानी जो विषय मांडला आहे मला एक सुचना करायची आहे. मा. आयुक्त साहेब आपल्या एकूण ३५ शाळा आहेत तिकडे एकही प्रशिक्षक नाही तर दोन प्रशिक्षक घ्यावे अशी माझी सुचना आहे.

ध्रुवकिशोर पाटील :-

मा. महापौर मॅडम मागे पण सांगितलेले की ह्यामध्ये मिरा भाईदरच्या शाळा इनव्हॉल्ड करा. प्रत्येक शाळेमध्ये ॲन्युअल स्पोर्टसचा प्रोग्राम होतो त्यांना टिचींग प्रशिक्षकाद्वारे कसे खेळायचे ते शिकवले जाते पण आपल्या महानगरपालिकेमध्ये तसे होत नाही म्हणून आपल्या महानगरपालिकेची एक स्वतंत्र स्पर्धा अरेंज करा.

मा. महापौर :-

ध्रुवकिशोर पाटीलजी आपणाला सांगू इच्छिते त्यावेळी सगळ्यात जास्त पारितोषिक म्यून्सिपल शाळेने घेतली जरी ते कम्बाईन्ड होते तरी आणि मी ह्याच्याशी सहमत आहे. आपण एक प्रशिक्षक ठेवायचा आहे हे तुमच्या माहितीसाठी की गेल्यावर्षी सगळ्यात जास्त पारितोषिक आपल्या म्युन्सिपल शाळेने घेतली.

मर्लिन डिसा :-

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो माझी एक सुचना आहे. आपण जे ऑन गोईंग टूर्नामेन्ट ठेवले आहेत त्याच्यातून जे टॅलेन्टेड मुल आहेत त्यांना आपण डिस्ट्रीक्ट लेवल,नॅशनल लेवल, इंटरनॅशनल लेवलला प्रोत्साहन करून कोचिंग देऊन त्यांना आपल्या महानगरपालिकेतर्फे जर ही मूले पूढे जाऊ शकतात त्याच्यासाठी आपण प्रोपर कोचेस.............

मा. महापौर :-

तीच सुचना ह्यांनी मांडलेली आहे.

प्रभात पाटील :-

मा. महापौर मॅडम माझी अशी सुचना आहे की, आपण सगळे अधिकार आयुक्तांना दिले आहेत चांगली गोष्ट आहे. माझी त्याच्यापलिकडे जाऊन अशी सुचना आहे. मा. आयुक्तांना माझी विनंती आहे तुम्हाला दिलेल्या अधिकारामध्ये तुम्ही कमिटी फम करा तुम्ही शहरातले काही खेळाडू बोलवा नगरसेवक असतील त्यांना खेळाविषयी आवड आहे. किंवा महानगरपालिकेच्या शाळामधले शिक्षक बोलवा, रिटायर्ड शिक्षक असतील ते घ्या त्यांना हा जो क्रिडा महोत्सव आहे त्याच्यात काय व्हरायटी आणता येतील किंवा काही वेगवेगळे निर्णय घेता येतील, किंवा नविन खेळ घालता येतील. जे खेळ आहेत त्यांना प्रोत्साहीत करता येईल जी कमिटी तुम्ही फम करा जेणेकरून तुम्हाला कॉ-ऑपरेशन होईल. सहकार्य होईल आपला महोत्सव

चांगल्याप्रकारे पार पडेल. माझी विनंती आहे की सगळ्यांना घेऊन सहकार्याने काम केले तर निश्चितपणे चषकाला वेगळे रूप येईल अशी माझी सुचना आहे.

प्रमोद सामंत :-

सुचना ठरावात समाविष्ठ कराव्यात.

मा. महापौर :-

ठराव सुचनेसह मंजूर करण्यात येत आहे.

प्रकरण क्र. ९१:-

महापौर चषक आयोजनाकरिता आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणे.

ठराव क्र ९१ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका शहरातील विविध शाळा, विद्यालय, महाविद्यालयातील होतकरु खेळाडूंच्या सुप्त गुणांना प्रोत्साहन मिळावे तसेच सदर खेळांडूना एक नविन व्यासपीठ उपलब्ध होऊन त्यामधील काही खेळाडू पुढे येऊन राज्य, राष्ट्रीय तसेच जागतिक स्तरावर आपले, आपल्या शहराचे नाव लौकीक करतील या हेतूने मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत महापौर चषक स्पर्धांसाठी खालील स्पर्धाचे आयोजन १२ वर्षाखालील, १४ वर्षाखालील, १७ वर्षाखालील व १९ वर्षाखालील मुलांमुलींसाठी करावयाचे आहे.

| | | |
|---|---|---|
| कबड्डी | खो-खो | रस्सीखेच |
| व्हॉली बॉल | फुटबॉल | लंगडी |
| क्रिकेट | स्विमिंग | बॅडमिंटन |
| धावणे | कुस्ती | कॅरम |
| बुध्दीबळ | | |

त्यानुसार ''महापौर चषक'' स्पर्धेचे आयोजन करण्यासाठी व त्यासाठी येणाऱ्या खर्चास रु.७० लाख खर्च अपेक्षित आहे. सदर महापौर चषक – २०१६ या स्पर्धेचे आयोजन करण्यासाठी सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकामध्ये रु.७५ लाख ची तरतुद करण्यात आलेली आहे.

तरी ''महापौर चषक'' स्पर्धेसाठी येणाऱ्या सर्व खर्चासाठी आर्थिक व प्रशासकीय मंजुरी तसेच ''महापौर चषक'' स्पर्धेमध्ये खेळाबाबत वेळोवेळी आवश्यक ते बदल करणे आयोजन व नियोजन करणेकामीचे सर्व अधिकार हि सभा मा. आयुक्त यांना प्रदान करीत आहे असा मी ठराव करीत आहे.

सुचक :- श्री. शरद पाटील अनुमोदन :- श्री. राकेश शाह

सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्या श्रीम. प्रभात पाटील यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.

मा. आयुक्त यांना दिलेल्या अधिकारात त्यांनी महानगरपालिका शाळांतील क्रिडा शिक्षक, रिटायर्ड शिक्षक, शहरातील विविध खेळाडू तसेच मार्गदर्शक यांची कमिटी नेमावी. जेणेकरुन चषकात विविध खेळांचा समावेश होईल व कार्यक्रमात सुसुत्रता येईल.

सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. प्रेमनाथ पाटील यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.

मिरा भाईंदर महानगरपालिका महापौर स्पर्धा २०१६ - मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या एकूण ३५ शाळांमध्ये २ खेळ प्रशिक्षक नेमणूक करावी अशी मी सुचना मांडत आहे.

सदर ठरावामध्ये सुचक श्रीम. मर्लिन डिसा व अनुमोदक श्रीम. सय्यद नुरजहॉ नझर हुसैन यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.

ह्या चषकमधील उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पुढे प्रशिक्षण द्यावे. ज्यामुळे जिल्हा, राज्य, राष्ट्रीय व आंतर्राष्ट्रीय पातळीवर जाण्याचे प्रात्साहन मिळेल. तसेच त्यांच्यासाठी राष्ट्रीय क्रिडा प्रशिक्षक नेमण्यात यावे.

सदर ठरावामध्ये सुचक श्री. प्रमोद सामंत व अनुमोदक श्रीम. कांचना पुजारी यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.

महासभेने ठरावाप्रमाणे मंजूरी दिलेल्या खर्चातील रक्कम खेळ या विषयावरच खर्च करण्यात यावी. गेल्या वर्षाप्रमाणे ७० लाख खर्चापैकी ४०% एवढी रक्कम मंडप व्यवस्था यावर करण्यात आली होती. असे न करता अश्याप्रकारच्या खर्चावर नियंत्रक ठेवावे तसेच शाळांना सरावासाठी योग्य वेळ देण्यात यावा. खाजगी क्लबना परवानगी देण्यात येऊ नये, अशी मी सुचना मांडत आहे.

ठराव सुचनेसह मंजूर

सही /-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ९२, विरार - वसईहून रेल्वेच्या पश्चिम भागातून येणारा रेल्वे समांतर व पुढे भाईंदर मिरारोड ते दहिसर लिंक रस्त्यास जोडणारा ४५.०० मी. रुंदीचा रस्ता मिरा भाईंदर शहराच्या विकास

योजनेत दर्शविण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदल करणेबाबत.

शरद पाटील :-

ह्याची माहिती सदस्यांना द्यावी.

मा.महापौर :-

खांबित साहेब येईपर्यत नविन अधिका-याचे इन्ट्रोडक्शन द्या.

मा.उपायुक्त (मुख्यालय) :-

मा. महापौर मॅडम ह्यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे आपल्या मिरा भाईदर महानगरपालिकेला उपायुक्त श्री. दिपक पुजारी आणि मुख्य लेखापरिक्षक श्री. निपाणे ह्या दोन अधिका-याची शासनाने ह्या महानगरपालिकेसाठी नियुक्ती केली आहे.

दिपक दिगंबर पुजारी :-

नमस्कार सन्मा. व्यासपिठ आदरणीय सभागृह मी दिपक दिगंबर पुजारी मुख्याधिकारी श्रेणी अ १-१-९६ पासून मी मुख्याधिकारी ह्या पदावर कार्यरत आहे. ह्यापूर्वी मी जालना नगरपालिकेत मुख्याधिकारी म्हणून काम करत होते. माझी २० वर्षाची सेवा झालेली आहे. ह्या व्यतिरिक्त महापालिका मालेगाव इथे मी उपायुक्त म्हणून काम केले. परभणीमध्ये मुख्याधिकारी त्यानंतर उपायुक्त असे तीन वर्ष महानगरपालिकेमध्ये काम केलेले आहे. मिरा भाईदर महानगरपालिकेमध्ये मला उपायुक्त म्हणून संधी मिळालेली आहे. आपल्या सर्वाच्या सहकार्याने मी निश्चित चांगले काम करेन अशी ग्वाही देतो.

सुभाष निपाणे:-

नमस्कार मा. महापौर मॅडम ,मा. आयुक्त,मा. सभागृह मी सुभाष निपाणे महाराष्ट्र वित्त लेखा सेवा या संवर्गात वर्ग २ म्हणून १९८६ ला जॉईन्ट झाले मी नागपूर महानगरपालिका कोशागार अधिकारी,चंद्रपूर लोकल फंड वर्धा त्यानंतर आर.टी.ओ. अंधेरी इ. ठिकाणी काम केलेले आहे. वसई विरार महानगरपालिका मध्ये १२ ते १६ पर्यत होतो. इथे मला काम करण्याची संधी मिळाली. आपल्या सर्वाच्या सहकार्याने चांगले काम करेन अशी मी ग्वाही देतो.

दिपक खांबित :-

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो, मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील एकूण चार कामे ही एम.एम.आर.डी.ए. मार्फत हाती घेण्यात आली आहेत. पहिले काम छत्रपती शिवाजी महाराज मार्ग गोल्डन नेस्ट सर्कल ते हायवेपर्यत जो रस्ता आहे. त्याठिकाणी तीन ब्रिज बांधायचे आहेत. त्यापैकी पहिल्या ब्रिजचे इस्टीमेट तयार करुन दिलेले आहे आणि दुसऱ्या दोन ब्रिजचे इस्टीमेटचे काम चालू आहे. पहिला जो ब्रिज आहे. दिपक हॉस्पीटल आणि गोल्डन नेस्ट सिग्नलला कव्हर करणारा त्याची टेंडर प्रोसेस सुरू आहे.१०-१२ दिवसात त्याचे टेंडर निघेल हे पहिले काम आहे दूसरा जो रस्ता आहे तो सुभाषचंद्र बोस मैदान ते उत्तनपर्यत जो रस्ता आहे त्याच्या रुंदीकरणाचे काम आहे तो रस्ता दोन भागामध्ये आहे. पहिला जो रस्ता आहे आपल्या हद्दीतला म्हणजे हद्द आपलीच आहे. पण नियोजन प्राधिकारी आपण आहोत. सुभाषचंद्र बोस मैदान ते डोंगरी हा ३० मिटर रूंदीचा रस्ता आहे. आणि डोंगरी ते उत्तन हा आता नविन एम.एम.आर.डी.ए. च्या प्लानमध्ये २० मिटरचा झाला आहे ह्या रस्त्याचे काम एम.एम.आर.डी.ए करणार आहे. त्यांनी कन्सल्टंट नेमण्याची प्रक्रिया सूरू केलेली आहे. टेंडर सुध्दा प्राप्त झालेले आहेत. त्याच्या स्तरावर सूरू आहे. फक्त ह्या रस्त्याकरीता जे ॲक्वीझेश्न करायचे आहे ते आणि सी.आर.झेड ची परवानगी ही महानगरपालिकेला करून द्यायची आहे. सी.आर.झेडची परवानगी अंतिम टप्प्यामध्ये आहे हा दूसरा रस्ता झाला तिसरा रस्ता आहे. जेसलपार्क घोडबंदर रस्ता हा ३० मिटर रूंदीचा रस्ता आहे. पहिला १८ मिटर आणि ३० मिटर जवळ जवळ ५ कि.मी. लांबीचा रस्ता आहे. ह्याचा सल्लागार नेमण्याची प्रक्रिया एम.एम.आर.डी.ए. नी पूर्ण केलेली आहे. लवकरच इस्टीमेंटचे काम सूरू होऊन ते टेंडर काढणार आहेत. त्यानंतर चवथा रस्ता आहे वसई विरार वरून जाणारा लिंक रस्ता आहे. दहिसरला जोडणार तो रस्ता त्या रस्त्यापैकी हा रस्ता डी.पी. मध्ये टाकण्याकरिता विषय आणला आहे. सुभाषचंद्र बोस मैदान आपण पाठीमागून रस्ता घेतला होता. सुभाषचंद्र बोस मैदान ते गणेश देवल नगर मधून जाणारा रस्ता होता परंतु वसई-नायगांव वरुन जो ब्रिज येणार आहे त्याची त्याने लाईन आऊट चेंज केल्यामुळे आपल्याला हा रस्ता नविन प्रस्तावित करायला लागला आणि रस्ता पुढे वसई नायगाव खाडीवरून सुभाषचंद्र बोस मैदानापर्यंत अडीच कि.मी. चा सरळ येणार आहे. ४५ मि. रूंदीचा आणि त्यानंतर सुभाषचंद्र बोस मैदानातून संत्संगमधून सरळ मिरारोड स्टेशनच्या समोरून दहिसरला जाऊन तो टच होणार आहे. जवळ जवळ ६-७ कि.मी. रस्ता आहे. त्याचे सुध्दा सी.आर.झेडचे क्लियरन्स अंतिम टप्प्यामध्ये आहेत आणि हा रस्ता करण्याकरिता एम.एम.आर.डी.ए. मार्फत कन्सल्टंट नेमण्यात आलेले आहेत ही कामे त्याचा मार्फत करण्यात येणार आहेत फक्त आपल्याला जागेची अलाईनमेन्ट एक्वीझेशन आणि सी.आर. झेडची मंजुरी आपल्याला करून द्यायची आहे. त्याचा खर्च ते लोक करणार आहेत. आपल्याला त्याना मदत करायची आहे. संपुर्ण होणाऱ्या खर्चाला गव्हरमेन्टने मुख्यमंत्री महोदयाच्या समितीने मान्यता दिलेली आहे. अशी चार कामे एम.एम.आर.डी.ए. मार्फत आपल्या हद्दीत सुरू होणार आहेत. नायगाव ते सुभाषचंद्र बोस मैदान हा आपण सरळ रस्ता प्रस्तावित करतो कारण वसई खाडीवरच्या ब्रिजचे टेंडर निघाले आहे.

नरेंद्र मेहता :-

आजचा विषय कशासाठी आहे.

दिपक खांबित :-

हा मॉडिफिकेशन नविन रस्ता टाकायचा आहे हा रस्ता डी.पी.मध्ये नाही.

भगवती शर्मा :-

पहले कहॉ से प्रस्तावित था।

दिपक खांबित :-

वो डी.पी रोड था वो हम लोग फॉलोअप कर रहे थे।

भगवती शर्मा :-

सुभाषचंद मैदान से आके सत्संग की और वो रस्ते को मंजूरी होगी के यह रस्ते को मंजूरी हेगी।

दिपक खांबित :-

यह रस्ते को होगी सुभाष चंद्र बोस मैदानसे सिधा निकलेगा सत्संग में से और मिरारोड स्टेशन के बाहर से दहिसर जायेगा। पहले प्रस्तावित था वो कॅन्सल किया वो कॅन्सल इसलिए किया की वहॉ से अपने को ब्रिज के अंदर आके शहर में पूरा ट्राफिक होती थी इसके लिए रद्द किया वो ३० मिटर का था यह ४५ मिटर का है।

भगवती शर्मा :-

वो डी.पी. रोड पहले था।

दिपक खांबित :-

डी.पी. आज भी है वो जो रस्ता है वो भी प्रस्तावित है। हम लोगको वो रस्ता भी लेके जाना है। फिर मिरारोड स्टेशन के उपरसे ब्रिज बनाने का अपना प्रस्ताव है।

मा. आयुक्त :-

ह्याच्यामध्ये १.७.१५ रोजी ठराव क्र. २८ प्रकरण क्र. ५५ अन्वये महासभेने ह्या पूर्वी मंजूरी दिलेली आहे.

नरेंद्र मेहता :-

खांबित साहेब सांगताता फेरबदल फेरबदलाचा विषय आम्ही कधीच मंजूर केला आहे.

दिपक खांबित :-

तुम्ही मंजूर केल्यावर सजेशन ऑब्जेक्शन मागवले जे सजेशन ऑब्जेक्शन आले त्यावर सुनावणी घेतली आणि फायनल मंजूरी करीता आज तुमच्याकडे आले आहे.

नरेंद्र मेहता :-

सर विषय असा आहे, माझ्या माहितीप्रमाणे आपण आयुक्तांना सर्व अधिकार दिले आहेत. अंतिम जे काही सुचवले आहे तेच कायम ठेवायचे आहे. जे तुम्ही केलेले आहे.

मा. आयुक्त :-

तुम्ही म्हणजे महासभेने दोघांनी मिळून केले आहे ते.

नरेंद्र मेहता :-

तुम्ही प्रस्तावित केले. तुम्ही ते प्रस्तावित केले आहे ना.

दिपक खांबित :-

हो.

नरेंद्र मेहता :-

जो होता तो कायम ठेवायचा आहे.

मा. आयुक्त :-

थोडक्यात प्रकरण क्र. ५५ ठराव क्र.२८ १/७/२०१५ प्रस्तावित फेरबदलाचा महाराष्ट्र प्रादेशीक व नगररचना नियम १९६६ चे ३७ (१) अन्वये प्रस्ताव शासनास सादर करायचा आहे. आणि ह्याच्याकरिता आता सध्या महासभेची हरकती आणि सुचना घेतल्यानंतर सुध्दा मंजूरी आहे असे ह्या ठिकाणी गृहीत धरायचे का? ह्या ठरावाच्या शेवटचा पॅरेग्राफ वाचा म्हणजे २०१५ साली म्हणजे १ जुलै २०१५ ला मंजूरी दिली होती. त्याच्यानंतर आपण ऑब्जेक्शन घेतले होते. ऑब्जेक्शन मध्ये हरकती सुचना मागवल्या होत्या त्याच्यामध्ये काही लोकांनी विरोध दर्शविला आहे. हा सगळा विषय आपल्यासमोर मांडला आहे. तरीसुध्दा १/७/२०१५ रोजी.............

भगवती शर्मा :-

२०१५ के ठराव में नेताजी सुभाष चंद्र बोस.................

दिपक खांबित :-

हा जो पहले मंजूरी ली थी वो वही रस्ता था यह जो रस्ता लाया है ना वही रोड है। आप जो बोलरहे है वो पहले की बात है ८-१० साल पहले की बात है। साहेब ह्याच्यात पण पूढे लाईन आऊट चेंज होण्याची शक्यता आहे. मिरारोड स्टेशन तो दहिसर पर्यत त्याला मंजूरी दिली तर बर होईल.

मा. आयुक्त :-

काही लोकांनी विरोध दर्शविला आहे. एक सुचना धारक आहे ह्यांनी प्रस्तावाला समर्थन दिलेले आहे हे सभेच्या समोर ठेवलेले आहे.

नरेंद्र मेहता :-

मला तेच सांगायचे आहे तुमची शिफारस आली पाहिजे होती. आम्हाला माहित नव्हते हरकती सुचना योग्य आहे की नाही. तुम्ही प्रस्तावित करा की ही सुचना अयोग्य आहे.

मा. आयुक्त :-

शेवटच्या ह्याच्यात आम्ही सबमीट केले ना.

नरेंद्र मेहता :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेकडून करण्यात आलेली कार्यवाही व सूचना / हरकती दरम्यान केलेले निवेदन इत्यादी विचारात घेता, मा. महासभा, प्रकरण क्र. ५५, ठराव क्र. २८, दि.०१/०७/२०१५ मधील प्रस्तावित फेरबदलास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) नुसार फेरबदलाच्या प्रस्तावास अंतिम मंजूरीसह सदरचा प्रस्ताव शासनास सादर करणेस व त्याअनुषंगीक पुढील सर्व कार्यवाही करणेसाठी आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना अधिकार देणेसाठी ही सभा मंजूरी देत आहे.

शरद पाटील :-

माझे अनुमोदन आहे.

रोहिदास पाटील :-

मा. महापौर मॅडम ह्याच्यामध्ये एक सुचना आहे पश्चिमेकडून जाणारा रस्ता भाईदर,मिरारोड, दहिसर मिरारोड जातेवेळी ज्याठिकाणी आपल्याला कलवर्ट बनवायचा आहे. मिरारोडचे संपूर्ण पाणी काढण्यासाठी कलवर्ट बनवायला लागेल. आज या साईडचा एरिया आहे. त्यामुळे त्याच्यामध्ये तो ॲप्रोच रोड म्हणून दाखवावा अशी मी आपणास विनंती करतो. ही सुचना घ्यावी त्याला आवश्यक असणारा ॲप्रोच रोड त्यामध्ये दाखवून ठेवा. गरज पडेल तेव्हा एम.एम.आर.डी.ए. वर अडचण येणार नाही.

संदिप पाटील :-

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो, सुभाषचंद्र बोस मैदान ते उत्तनपर्यंत जाणारा जो रस्ता आहे. सुभाषचंद्र मैदान ते कुंबाटा तो ३० मिटरचा आहे. त्याच्या कुंबाटा ते उत्तन चौक हा २० मिटर आहे. त्याच्यमध्ये जी घर बाधीत होती त्यांना आपण काय मोबदला देणार कारण ती १०० वर्षापूर्वीची जुनी घर आहेत. मा. आयुक्त साहेब ह्याचा खुलासा करा.

रमेश जैन :-

सदर दहिसर लिंक रस्ता तयार करताना विकास योजनेतील रस्त्यात बदल करावा लागल्यास सदर फेरबदलास देखील ही सभा मान्यता देत आहे.

सुमन कोठारी :-

माझे अनुमोदन आहे.

दिलीप घेवारे :-

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो, तो रस्ता एम.एम.आर.डी.ए करणार आहे. आपण करणार नाही.

संदिप पाटील :-

साहेब एम.एम.आर.डी.ए. करणार पण जी रस्त्यामध्ये घर आणि बिल्डींग आहेत ते आपल्याला खाली करून द्यायचे आहे.

दिलीप घेवारे :-

डी.पी. रोडमध्ये जी मालमत्ता बाधीत होतात त्यांना आपण टी.डी.आर देणार किंवा पर्यायी जागा देणार.

संदिप पाटील :-

साहेब ते दोन्ही साईडचे जागा आहेत त्या सी.आर.झेड. च्या आहेत त्याच्यामध्ये सरकारी लॅन्डपण आहे त्याला तुम्ही टी.डी.आर कसे देणार?

दिलीप घेवारे :-

ह्याच्यात आपण शासनाची विशेष परवानगी घेऊ कारण सी.आर.झेड रस्त्यामध्ये आहे रस्ता विकसीत करणे आवश्यक आहे. त्यामूळे हा प्रस्ताव शासनाला पाठवून मंजूरी घेऊ.

संदिप पाटील :-

माझे प्रशासनाला विनंती आहे की तुम्ही रस्ता डॅमेशन करणार त्यांना तुम्ही मोबदला द्या त्या नंतर खाली करा. अशी माझी सुचना आहे.

जुबेर इनामदार :-

मा. महापैार मॅडम माझी ह्या विषयावर एक शंका आहे. हरकती सुचना ही महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम ६ एक भाग आहे. हरकती सुचना मध्ये २ व्यक्तिनी हरकत घेतलेली एकाने हरकत घेतलेली नाही अशा परिस्थितीत महासभा हा निर्णय घेऊ शकते का? कायद्याची बाजू आम्हाला जाणून

घ्यायची आहे. कारण हे उद्या न्यायालयात धाव ठोकली तर आम्ही अडचणीत येता कामा नये मग हरकती सुचना ही प्रक्रिया का?

दिलीप घेवारे :-

जे एम.आर.टी.पी. ॲक्टचे ३७ कलम आहे. त्याच्यात पहिला ठराव घ्यायचा ३७ (१) नुसार तो पेपरमध्ये गॅझेटमध्ये पब्लिश झाल्यानंतर ३० दिवसाच्या आतमध्ये सुचना हरकती मागवायच्या असतात. त्याच्यावर एक सुनावणी घ्यायची असते. सुनावणी घेऊन अंतिम रिपोर्ट जो आहे तो महासभेला सादर करायचा असतो. त्यानंतर जो ठराव आहे आणि प्रस्तावित जे मॉडिफिकेशन आहे ते आपल्याला शासनाला पाठवावे लागते ३७(२) नुसार शासनाकडून ज्या वेळेस मंजूरी मिळते त्यावेळेस तो आपला ठराव आलेल्या सुचना हरकती ह्यांचा विचार करून शासन मंजूरी देते. त्यामुळे आपल्याला प्रॉब्लेम येण्याचे काही भाग नाही.

जुबेर इनामदार :-

महासभेने हा निर्णय घेतला की हा रस्ता आम्हाला करायचा आहे. हरकती सुचना....................

दिलीप घेवारे :-

जसे आमदारसाहेब बोलले आपण आयुक्तांना सर्व अधिकार देतो. दूसरा ठराव जो सुचना हरकती नंतर असतो प्रशासन तो डायरेक्ट शासनाला पाठवून देतो ह्याच्यात तसे वाक्य नसल्यामूळे आम्ही तो तुमच्यासमोर दुसऱ्यांदा आणला आहे.

संदिप पाटील :-

मा. आयुक्त साहेब मला एक खुलासा करायचा आहे जे रोडचे डायमेशन आहे ते नगरपालिका क्लेम करणार की एम.एम.आर.डी.ए. क्लेम करणार जे अतिक्रमण आहे ते नगरपालिका हटवणार की एम.एम.आर.डी.ए. हटवणार?

दिलीप घेवारे :-

एम.एम.आर.डी.ए. करणार.

संदिप पाटील :-

असे तुमच्याकडे लेखी आहे का?

दिलीप घेवारे:-

लेखी नाही पण एम.एम.आर.डी.ए.च्या प्रस्तावामध्ये.....................

संदिप पाटील :-

माझ्या माहितीप्रमाणे मी एम.एम.आर.डी.ए. मध्ये चौकशी केलेली आहे. रस्त्याचे डायमेशन नगरपालिका क्लियर करून देणार आहे. रस्त्याचे डायमेशन नगरपालिका क्लियर करून देत असेल तर एम.एम.आर.डी.ए. रस्ता बनवणार आहे. एम.एम.आर.डी.ए. तिथले अतिक्रमण हटवणार नाही.

दिलीप घेवारे :-

आमच्याकडे सर्व अलायमेन्ट आहे. सर्वेक्षण झालेले आहे.

संदिप पाटील :-

मग तसा खुलासा कराना एम.एम.आर.डी.ए हटवणार की नगरपालिका हटवणार. कारण लोकांना जवाब आम्हाला द्यायचे आहेत ज्या रस्त्यामध्ये घर बाधीत होणार आहे. बिल्डींग बाधीत होणार आहे त्यांना लोकप्रतिनिधीनाच जवाब द्यायचा आहे.

दिलीप घेवारे :-

ह्याच्यामध्ये अंतिम काही झालेले नाही. ज्यावेळेस एम.एम.आर.डी.ए. अधिका-याबरोबर चर्चा होईल त्यावेळी कोणी करायचे ते ठरवू. अजून काय करायचे ते ठरले नाही.

संदिप पाटील :-

लाईनआऊट फायनल करणार. त्यावेळी आम्हाला विश्वासात घ्या. तिथल्या ग्रामस्थाना विश्वासात घ्या.

दिलीप घेवारे :-

ज्यावेळी सर्व्हे होईलना अलायमेन्ट मार्किग होईल जागेवर मार्किग सुध्दा होणार.

प्रमोद सामंत :-

घेवारे साहेब तुम्ही लाईनआऊट तयार केली असेल ना.

दिलीप घेवारे :-

आमच्याकडे सगळ तयार आहे.

संदिप पाटील :-

तयार आहे तर दाखवा. लाईनआऊट तयार आहे तर दाखवा.

दिलीप घेवारे :-

तो दोन टप्प्याचा रस्ता आहे अर्धा टप्पा आपल्या भागात आहे. डोंगरीपासून पुढे त्यांच्या भागात आहे. ज्यावेळी को-ऑर्डिनेशन मिटींग होईल त्यांची आणि आपली त्यावेळी आपण ठरवू कसे करायचे कुठे करायचे.

संदिप पाटील :-

मोरव्यापर्यंत परिसर ते उत्तन चौक हा एम.एम.आर.डी.ए. च्या अंडरमध्ये येतो. सुभाषचंद्र बोस मैदान ते राई हा परिसर नगरपालिकेच्या ताब्यात आहे.

प्रमोद सामंत :-

तुम्ही जे तयार केलेले लेआऊट असेल ते दाखवा असे विषय महासभेत येतात तेव्हा सदस्यांना त्याची माहिती पाहिजे.

दिलीप घेवारे :-

हा विषय महासभेत नाही वेगळा विषय आहे.

संदिप पाटील :-

साहेब तुम्ही रस्त्याला मंजूरी घेता.

दिलीप घेवारे :-

कुठल्या.

संदिप पाटील :-

आता विषय झाला. सुभाषचंद्र बोस ते उत्तन.

दिलीप घेवारे :-

संदिप पाटील साहेब तो वेगळा विषय आहे. हा वेगळा विषय त्याची संपूर्ण माहिती माझ्याकडे आहे. तो विषय नाही म्हणून आणलेला नाही. हा १ जुलै २०१५ ला तुम्ही मंजूर केलेला विषय आहे.

बर्नड डिमेलो :-

मा. महापौर मॅडम, हा विषय जरी नसला तरी आता खांबित साहेबांनी माहिती देताना डोंगरीपर्यंत आणि डोंगरीच्यापुढे. माझी अशी सुचना आहे की आपण त्यांना दाखवायला पाहिजे. पाटील साहेबांनी सांगितले त्यांना मोबदला जे काही नियमानुसार आहे ते मिळेलच. परंतु आपल्याला असे पण करता येईल की एम.एम.आर.डी.ए. ला रस्त्याचे सांगताना की ह्या ठिकाणी बाधीत लोक जास्त असतील तर रस्ता दुसऱ्या ठिकाणी फिरवता येतील का? अशी उपाययोजना करता येईल का? मला वाटते ह्यावर अभ्यास करणे गरजेचे आहे अशी माझी सुचना आहे.

यशवंत कांगणे :-

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो. खांबित साहेब जिथपर्यंत घोडबंदरचा रस्ता येणार आहे आणि जेसल पार्कला कनेक्ट होणार आहे आणि दुसरा रस्ता नायगाववरुन येणार आहे तो भाईंदरला टच होणार आहे. माझे एक सजेशन आहे कारण जो रस्ता घोडबंदरवरुन येणार आहे तो रस्ता भाईंदरची जी खाडी आहे त्यानंतर कोळी नगर आहे. तिथे जर फ्लाय ओव्हर घेतला आणि तो फ्लाय ओव्हर रेल्वे समांतरच्या तिकडे रस्ता खाली उतरवला आणि तो फ्लाय ओव्हर कन्टीन्यू आणि पुढे केला तर तो येणारा नायगावचा रस्ता आहे त्याला जॉईन्ट केला जसा कापूरबावडीला रस्ता आहे. एक भिवंडीवरुन सबवे येतो. म्हणजे फ्लाय ओव्हर येतो आणि तो मुंबईला जाणाऱ्या रस्त्याला कनेक्ट होतो. जर अशाप्रकारे केल तर जेसल पार्कला जो पुढे ट्राफीकचा डिर्स्टब होणार आहे तो होणार नाही आणि जेणेकरुन आम्हाला अजून एक फ्लाय ओव्हर भेटेल जो घोडबंदरला जाणाऱ्या रस्त्याला कनेक्ट होईल आणि ट्राफीकचा जो प्रॉब्लेम क्रिएट होणार आहे तो चांगल्या प्रकारे व्यवस्थित होईल. तर त्याच्यावर सुचना आहे त्याच्यावर विचार करावा अशी माझी विनंती आहे.

ध्रुवकिशोर पाटील :-

मा. महापौर मॅडम, रस्ता व्हायला पाहिजे हे बरोबर आहे पण डी मॅंग्रोज आहे आणि पांथळ क्षेत्रफळ आहे. आणि कदाचित परमिशन नाही मिळेल तर आपण एलिवेटेड ब्रिजचा पर्याय देऊ शकतो म्हणून घेवारे साहेब माझे सजेशन आहे. पण प्रपोजल सॅमलटेनीसली हे करा. तिथे जर तुम्हाला परमिशन नाही दिली की इथे खूप मॅंग्रोज आहेत. कारण वाशीला पण खूप मॅंग्रोज असल्यामुळे परमिशन भेटली नाही असे असेल तर एलिवेटेड रोड प्रपोज करा.

मा. महापौर :-

ठराव सुचनेसह मंजूर.

प्रकरण क्र. ९२ :-

विरार - वसईहून रेल्वेच्या पश्चिम भागातून येणारा रेल्वे समांतर व पुढे भाईंदर मिरारोड ते दहिसर लिंक रस्त्यास जोडणारा ४५.०० मी. रुंदीचा रस्ता मिरा भाईंदर शहराच्या विकास योजनेत दर्शविण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदल करणेबाबत.

ठराव क्र. ९२ :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेकडून करण्यात आलेली कार्यवाही व सूचना / हरकती दरम्यान केलेले निवेदन इत्यादी विचारात घेता, मा. महासभा, प्रकरण क्र. ५५, ठराव क्र. २८, दि.०१/०७/२०१५ मधील प्रस्तावित फेरबदलास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) नुसार फेरबदलाच्या प्रस्तावास अंतिम मंजूरीसह सदरचा प्रस्ताव शासनास सादर करणेस व त्याअनुषंगीक पुढील

सर्व कार्यवाही करणेसाठी आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना अधिकार देणेसाठी ही सभा मंजूरी देत आहे.

सुचक :- श्री. नरेंद्र मेहता          अनुमोदन :- श्री. शरद पाटील

सदर ठरावामध्ये सुचक डॉ. रमेश जैन व अनुमोदक श्रीम. सुमन कोठारी यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.

सदर दहिसर लिंक रस्ता तयार करताना विकास योजनेतील रस्त्यात बदल करावा लागल्यास सदर फेरबदलास देखील ही सभा मान्यता देत आहे.

सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.

भाईंदर - मिरारोड - दहिसरकडे जाणारा प्रस्तावित रस्ता दाखवते वेळी मिरारोड दहिसर रेल्वे खांबा ८ व ९ कडे कल्वर्टकडे जाण्यासाठी प्रस्तावित आवश्यक तो रस्ता दाखवावा अशी सुचना मांडत आहे.

ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर

सही /-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

मर्लिन डिसा :-

मॅडम तुमच्या परवानगीने विचारायचे आहे कमिशनर साहेब, ही जी स्वच्छता अभियान आपण राबविली होती ही प्लास्टीक वापरण्याची पध्दत चालू आहे. It is hampering the whatern cleaniness ripe been taking sagrigation of garbage conscript or putting what are you doing about it are you giving instruction to the shopkeepers about what should be the thickness or the plastic that is to be used of been ban plastic all together in the city. The byo crackers now for diwali residensial area में shops coming outside what are the precaution taking to keep away crackers so that there is no fire hazerdes.

मा. आयुक्त :-

सुचनेची नोंद घेतलेली आहे. त्याप्रमाणे आवश्यक ती सुचना देतो.

मा. महापौर :-

मी सभा संपली असे जाहिर करते आणि सर्व सदस्यांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा.

मा. आयुक्त :-

सर्व नगरसेवकांना दिवाळीच्या शुभेच्छा.

प्रशांत दळवी :-

माजी नगरसेवक श्री. चंद्रकांत म्हात्रे ह्यांच्या मिसेस माजी नगरसेविका सरिता चंद्रकांत म्हात्रे ह्यांचे अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. आम्ही सभागृहाच्या वतीने त्यांच्या दु:खात सहभागी आहोत. त्यांच्या मृतात्म्यास चिरशांती लाभो अशी मी प्रार्थना करतो. व म्हात्रे कुटुंबियाना हे दु:ख सहन करण्याची शक्ती देवो अशी मी ईश्वर चरणी प्रार्थना करतो व त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

दिनेश जैन :-

डॉ. पोपट ज्येष्ठ कार्यकर्ते त्यांच्या वडिलांचे निधन झालेले आहे त्यांचा मी शोक प्रस्ताव मांडतो.

जुबेर इनामदार :-

नगरसेविका झिन्नत कुरेशी ह्यांच्या वडिलांचे निधन झालेले आहे त्यांच्यासाठी शोकप्रस्ताव मांडत आहे.

दु:खवटा ठराव क्र. ९३ :-

माजी नगरसेवक श्री. चंद्रकांत म्हात्रे ह्यांच्या मिसेस माजी नगरसेविका सरिता चंद्रकांत म्हात्रे ह्यांचे अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. तसेच डॉ. पोपट ज्येष्ठ कार्यकर्ते त्यांच्या वडिलांचे निधन झालेले आहे. तसेच नगरसेविका झिनत कुरेशी ह्यांच्या वडिलांचे निधन झालेले आहे त्यांच्यासाठी शोकप्रस्ताव मांडत आहे.

सुचक :- श्री. प्रशांत दळवी          अनुमोदन :- श्री. दिनेश जैन

ठराव सर्वानुमते मंजूर

सही /-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महापौर :-

आजची विशेष सभा संपली असे मी जाहिर करते.

(सभा संपण्याची वेळ दु. २.०० वाजता)

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)
प्र. नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका